


महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ४२, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार १४ जानेवारी २०२५ ते सोमवार २० जानेवारी २०२५ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## कुणालाही दयामाया दाखवू नका, एकही आरोपी सुटता कामा नये

### मुख्यमंत्र्यांचा बीड SP, CID अधिकाऱ्यांना फोन



**बीडमधील सरपंच हत्याप्रकरणाचा सीआयडी पोलिसांकडून वेगाने तपास सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या एसआयटीकडून हा तपास होत आहे. मात्र, तपास अधिकाऱ्यांकडून पीडित देशमुख कुटुंबीयांना हवी ती माहिती दिली जात नाही,त्यामुळे धनंजय देशमुख यांनी आज टाकीवर चढून आंदोलन केले. तसेच, माझ्या भावासारखंच मलाही मारुन टाकलं जाईल, त्यापेक्षा मीच जीवन संपवतो म्हणत त्यांनी संतापही व्यक्त केला. त्यानंतर, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन धनंजय देशमुख यांचे मन वळवले.**

■ मुंबई : विशाल कारंडे

दुसरीकडे सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबईत सह्याद्री अतिथी गृहावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याप्रकरणी वाल्मिक कराडला ३०२ चा आरोपी करावा, अशी मागणी केली. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी अधीक्षक नवनीत कावत आणि एसआयटी प्रमुखांना फोन करुन तपासात कुणालाही दयामाया दाखवू नका, असे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे एसपी नवनीत कावत आणि सीआयडी अधिकाऱ्यांना फोन करुन मस्साजोग हत्याकांडप्रकरणी आतापर्यंतच्या तपासाचा आढावा घेतला. याप्रकरणातील एकही आरोपी सुटता कामा नये, अशा सूचनात्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. तपासात जे-जे दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे, कुणालाही दयामाया दाखवू नका, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी तपास अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. मराठा क्रांती मोर्चा चे मुख्य समन्वयक रमेश केरे पाटील यांनीही मुख्य मंत्र्यांची भेट घेतली. (शेष पृष्ठ ३ वर)

## नागपूर ते गोवा द्रुतगती महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाला, राज्य सरकारचा हिरवा कंदिल

■ मुंबई : विशाल कारंडे

सांगली आणि कोल्हापूरमधील शेतकरी, स्थानिकांच्या विरोधानंतर, निवडणुकांपूर्वी नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्याचा निर्णय गुंडाळून पुन्हा शक्तीपीठ महामार्ग बांधण्याची हालचाल सुरू झाली आहे. राज्य सरकारने प्रकल्पाला हिरवा कंदिल दाखवला असून सरकारच्या निर्देशानुसार प्रकल्प मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पहिले पाऊल उचलले आहे. पर्यावरण विभागाच्या परवानगीसाठीचा




प्रस्ताव केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. तसेच जेथे महामार्गाला विरोध आहे तेथे संरेखनात बदल करण्याच्या विनंतीसह हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर नागपूर ते गोवा असा ८०५ किमीचा आणि अंदाजे ८५ हजार कोटी रुपये खर्चाचा शक्तिपीठ महामार्ग बांधण्यात येणार आहे. १२ जिल्ह्यांतून जाणाऱ्या हा महामार्गामुळे नागपूर ते गोवा अंतर २० ते २२ तासांऐवजी १० तासांत पार करता येणार आहे. हा महामार्ग झाला तर तो राज्यातील सर्वाधिक लांबीचा महामार्ग असेल. तेव्हा असा हा महत्त्वाकांक्षी महामार्ग मार्गी लावण्यासाठी एमएसआरडीसीने ठोस पाऊल उचलून पर्यावरण परवानगीचा प्रस्ताव केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठविला होता. त्या प्रकल्पासाठीच्या भूसंपादनाची अधिसूचना प्रसिद्ध करून भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली होती. मात्र त्या महामार्गाला कोल्हापूर आणि सांगलीतील शेतकऱ्यांनी, जमीन मालकांनी जोरदार विरोध केला. या विरोधाचा फटका महायुतीला लोकसभा निवडणुकीत बसला. विधानसभेत या मुद्द्याचा फटका बसू नये म्हणून (शेष पृष्ठ ३ वर)

## अंधेरीतील झोपु योजनेतील मृत व्यक्तींच्या नावे असलेल्या सदनिकांच्या झोपडीवासीयांची पात्रता रद्द

■ मुंबई : राकेश गायकवाड

**अंधेरीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत घर मिळालेल्या झोपडीवासियांच्या नावे पुन्हा नव्याने पात्रता करून घेऊन घरे लाटण्याच्या घोटाळ्यात आणखी सहा बोगस झोपडीवासियांची पात्रता रद्द करण्यात आली आहे. या बोगस सहा झोपडीवासियांमध्ये दोघा मृत व्यक्तींच्या परिशिष्टातील क्रमांकाचा पात्रतेसाठी वापर करण्यासाठी बोगस कागदपत्रे बनविल्याची बाब उघड झाली आहे.**

याआधी प्राधिकरणातील सक्षम प्राधिकाऱ्याने २१ जणांची पात्रता रद्द केली होती. प्राधिकरणात कार्यरत असलेल्या दलालांमार्फत बोगस झोपडीवासीय पात्र करण्याचे प्रकार सुरु असल्याचे आढळून आले आहे. अशी रीतीने झोपु योजनांत दुहेरी पात्रता मंजूर करून घेण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. झोपु योजनेत एकदा घर मिळाल्यानंतर संबंधित झोपडीवासीय पुन्हा घर मिळण्यास पात्र ठरत नाही. परंतु अंधेरी पश्चिमेतील श्रीरामवाडी गांधीनगर झोपु योजनेत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सक्षम प्राधिकाऱ्यांनी अशा घर मिळालेल्या २७ जणांना पात्र केले होते. याबाबत याच योजनेतील जागरूक झोपडीवासीयांनी तक्रार केल्यानंतर जागे झालेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सुरुवातीला २१ आणि आता आणखी सहा अशा सर्व २७ जणांची पात्रता रद्द केली आहे. यापैकी नऊ जणांना सहकारी गृहनिर्माण संस्थेने प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या सदनिकांचे वितरण केल्याची बाब समोर आली आहे. उर्वरित बोगस झोपडीवासीय प्रकल्पबाधितांसाठी असलेली घरे लाटण्याच्या तयारीत आहेत. या योजनेत २५६ झोपडीवासीयांना सदनिकांचे




वितरण करण्यात आले आहे. याशिवाय ४२ सदनिका प्रकल्पग्रस्तांसाठी उपलब्ध आहेत. या सदनिका प्राधिकरणाकडे विकासकाने सुपूर्द करणे बंधनकारक होते. मात्र या सदनिकांमध्ये बोगस झोपडीवासीयांचे वास्तव्य आहे. याबाबत सुनावणी देऊन कारवाई केली जाणार असल्याचे उपजिल्हाधिकारी वैशाली लंभाते यांनी सांगितले. (शेष पृष्ठ ३ वर)

## संक्षिप्त

### राज्यात महिलांवरील लैंगिक अत्याचारात मुंबई पहिल्या स्थानावर, पुणे दुसऱ्या स्थानावर

■ नागपूर: सम्यक कासारे

राज्यात महिला व जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. राज्यात यावर्षीसुद्धा महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. राज्यातील प्रमुख पाच शहरात २३२९ बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये पहिल्या स्थानावर मुंबई कायम आहे तर दुसऱ्या स्थानावर पुण्याचा क्रमांक लागतो.



तिसऱ्या स्थानावर ठाणे शहर तर चवथ्या स्थानावर नागपूरचा क्रमांक लागतो, ही माहिती पोलिसांच्या संकेतस्थळावरील वार्षिक आकडेवारीतून समोर आली. राज्यात महिलांवरील लैंगिक अत्याचारात वाढ झाली आहे. महिलांवरील बलात्काराच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य देशात चवथ्या स्थानावर आहे. महिला सुरक्षेला प्राधान्य देण्याचा दावा जरी सरकारने केला असला तरी राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२४ यादरम्यान मुंबई शहरात सर्वाधिक ९५८ मुली-तरुणी आणि महिलांवर बलात्कार झाल्याच्या घटना उघडकीस आल्या.

### २०२७ नंतरही मुंबईच्या टोल नाक्यावर जड-अवजड वाहनांकडून टोलवसुली

■ मुंबई : गणेश बागडे

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुंबईच्या वेशीवरील पाच पथकर नाक्यांवर हलक्या वाहनांना, शाळांच्या बस आणि एसटी गाड्यांना पथकर माफी देण्यात आली. या निर्णयानुसार पथकर वसुलीचा कालावधी संपेपर्यंत पथकर माफीमुळे पथकर



वसूल करणाऱ्या कंपनीला नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. नुकसान भरपाईची ही रक्कम एक हजार कोटींपेक्षा अधिक असून ती वसूल करण्यासाठी पाचही पथकर नाक्यांवरील जड आणि अवजड वाहनांसाठीच्या पथकर वसुलीचा कालावधी वाढविण्यात येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) याबाबतचा अभ्यास सुरु आहे. या अभ्यासाअंतर्गत पाचही पथकर नाक्यांवरील नुकसान भरपाईच्यादृष्टीने सर्वेक्षण सुरु झाले असून त्याच्या अहवालावर आधारित प्रस्ताव लवकरच राज्य सरकारकडे पाठविला जाणार आहे. हा प्रस्ताव मान्य झाल्यास जड-अवजड वाहनांकडून २०२७ नंतरही पथकर वसूल करण्यात येणार आहे.




## टोरेस कंपनीचा सीईओ दहावी नापास

### टोरेस कंपनीच्या चौकशीत धक्कादायक बाब उघड! सीईओ दिसण्याकरता घालायचा फॉर्मल कपडे

■ मुंबई : नितीन देवळेकर


कोट्यवधी रुपयांची फसवणूक केलेल्या टोरेस स्कॅम हा दोन युक्रेनिअन नागरिकांनी आणला होता. हा स्कॅम उघड होण्याच्या आठवड्यापूर्वीच या दोघांनी देशातून पलायन केले. गुंतवणूक घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने यासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले, व्हिक्टोरिया कोवालेन्को आणि ओलेना स्टॉईन हे दोन फरार युक्रेनिअन नागरिकांचा या स्कॅममध्ये हात आहे. यामुळे हजारो लहानमोठ्या गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोवालेन्को आणि स्टॉईन यांनी त्यांचे सहकारी आणि इतर कर्मचाऱ्यांना सांगितले की, ते ख्रिसमसच्या सुट्टीसाठी घरी युक्रेनला जात आहेत. पण ते सुट्टीवरून परत आलेच नाहीत. वरिष्ठ अधिकऱ्यांच्या गैरहजेरीत पगार आणि इतर देयके थकीत राहिल्याचं लक्षात आल्यावर त्यांच्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाची तोडफोड केली. विशेषत: नवी मुंबईतील सानपाडा आणि दादर येथील दुकानांमधील गोंधळामुळे टोरेसद्वारे चालवल्या जाणाऱ्या पॉन्झी स्कीममधील गुंतवणूकदारांना काहीतरी गडबड असल्याचं लक्षात आलं. याप्रकरणात टोरेसच्या संचालिका आणि उझबेकच्या नागरिक तानिया कासाटोवा आणि स्टोअर प्रभारी व्हॅलेंटिनो गणेश कुमार (रशियन) यांना अटक करण्यात आली. 'आम्हाला शंका आहे की ते त्यांच्या शेअर्सच्या वाट्यावरुन भांडत होते. कर्मचाऱ्यांना याची माहिती मिळाली तेव्हा त्यांनी दुकानांची तोडफोड केली', असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. काही कर्मचाऱ्यांनी स्थानिक शिवाजी पार्क पोलिसांशी संपर्क साधला. (शेष पृष्ठ ३ वर)

## अमित शाह यांची टीका, 'सत्तेसाठी गद्दारी करणाऱ्या उद्धव ठाकरेंना महाराष्ट्राच्या जनतेने...'

■ मुंबई : मेहुल गायकवाड

शिर्डीतल्या मेळाव्यात अमित शाह यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली आहे. शिर्डीतल्या अधिवेशनात भाजपाच्या कार्यकर्त्यांचं अमित शाह कौतुक केलं आहे. विरोधकांवर अमित शाह यांनी जोरदार टीका केली. विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच हा मोठा कार्यक्रम पार पडला. राज्यभरातील भाजपाचे बडे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या सोहळ्याला उपस्थित होते. अमित शाह यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली.

महाराष्ट्राच्या विजयाचे अनेक अर्थ आहेत. महाराष्ट्राच्या विजयाने १९७८ पासून शरद पवारांनी जे दगा फटक्याचं जे राजकारण होतं ते २० फूट गाडण्याचं काम केलं. उद्धव ठाकरेंनी आपल्याशी जो द्रोह केला, २०१९ ला विचारधारा सोडली आणि बाळासाहेब ठाकरेंच्या सिद्धातांशी तडजोड केली. फसवणूक करुन, लबाडी करुन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री




झाले होते. उद्धव ठाकरेंना महाराष्ट्राने त्यांची जागा दाखवली. १९७८ ते २०२४ पर्यंत महाराष्ट्रात अस्थिरतेचं राजकारण सुरु होतं. ते जनतेने संपवून दाखवलं. हिंदुत्व आणि मोदींच्या विकासाच्या राजकारणाला लोकांनी मतं दिली. विरोधी पक्ष बाहया सरसावून वाट बघत होते की लोकसभेनंतर महाराष्ट्रात आपलाच विजय होईल. त्यांचं स्वप्न भंग करण्याचं काम महाराष्ट्राच्या जनतेने केलं. अनेक निवडणुका अशा असतात ज्या राज्यांचं राजकारण बदलतात. काही निवडणुका अशा असतात ज्या देशाचं राजकारण बदलतात. मी आज तुम्हाला जे सांगतो आहे ते लक्षात ठेवा आणखी २५ वर्षांनी इतिहास साक्षीदार असेल की महाराष्ट्राचा महाविजयाचं उदाहरण दिलं जाईल. (शेष पृष्ठ ३ वर)

## महाविकास आघाडीत धुसफुस; शिवसेनेच्या स्वबळाच्या नाऱ्यानंतर कॉँग्रेस, राष्ट्रवादीचीही स्वतंत्र लढण्याची तयारी

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

आगामी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुका शिवसेना स्वबळावर लढविणार असल्याचे शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी जाहीर करतानाच कॉँग्रेस आणि राष्ट्रवादीनेही (शरद पवार) स्वबळाचा सूर लावल्याने महाविकास आघाडीत बिघाडी निर्माण झाल्याचे चित्र आहे. शिवसेना मुंबई, ठाणे, नागपूरपासून सर्वत्र महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. मुंबई, ठाणे नागपूरमध्ये कार्यकर्त्यांना संधी न दिल्यामुळे पक्ष वाढीला फटका बसतो. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी स्वबळावर लढवाव्या असे वक्तव्य राऊत यांनी केले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठोपाठ कॉँग्रेसनेही मुंबई महापालिकेची आगामी निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना संधी मिळावी, अशी कॉँग्रेस कार्यकर्त्यांची भावना आहे. या भावना पक्षश्रेष्ठींना कळवू आणि पक्षाचे वरिष्ठ नेते मुंबईपासून नागपूरपर्यंत कसे लढायचे याचा निर्णय घेतील, असे मुंबई कॉँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांनी सांगितले.





कॉँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावना वरिष्ठ नेत्यांना कळवणे हे आमचे काम आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत आघाडी धर्म पाळून आघाडीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी कॉँग्रेस पक्षाने प्रयत्न केला. संजय राऊत यांनी त्यांच्या पक्षाचे मत मांडले तसेच कॉँग्रेसचे मतही आम्ही मांडू, असेही गायकवाड म्हणाल्या. शिवसेनेला आमच्याबरोबर राहायचे नसेल तर हरकत नाही. राष्ट्रवादी आणि कॉँग्रेस आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित लढेल. शेवटी राष्ट्रवादी आणि कॉँग्रेस यांची आघाडी नैसर्गिक आहे, असे कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

संजय राऊत यांच्या विधानाचे आश्चर्य काहीच वाटले नाही. शिवसेना – भाजप युती असताना दोन्ही पक्ष महापालिका निवडणुका स्वबळावर लढत असत. कॉँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीतही आम्ही दोन्ही पक्ष वेगळे लढत होतो, असे राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगत राष्ट्रवादीही स्वबळावर लढण्यास तयार असल्याचे संकेत दिले.




# आत्मपरीक्षणासाठी स्वबळाची ओढ!

लोकसभा निवडणुकीनंतर निर्माण झालेला आशावाद ठाकरेंची शिवसेना, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसाठी विधानसभेच्या निवडणुकीत सपशेल निराशा करणारा ठरला. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्वबळाचा सूर लावला जाणार हे स्पष्ट झाले होतेच. विधानसभेला विरोधकांच्या महायुतीची अवस्था सोबत 'असून अडचण, नसून खोळंबा' अशी झाली. त्याही वेळी स्वबळाचा सूर अधूनमधून ठाकरेंच्या शिवसेनेकडून लावला जात होताच. आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने पुढील पाच वर्षात राज्यातील सरकारच्या 'स्थिरतेला' धक्का लावणे अशक्य असल्याचे महायुतीच्या शिलेदारांनी ओळखले आहे. परिणामी येत्या काळात राज्यातील फडणवीस सरकारला धक्का देण्याचे प्रयत्न निकालात निघाले आहेत. अशा परिस्थितीत ठाकरेंच्या शिवसेनेने 'एकांगी पराभवाचे' वास्तव स्वीकारले आहे. या पराभवातून 'राजकीय' धडे शिकण्यासाठी महापालिका ही विधानसभेच्या सहामाही परीक्षेनंतरची वार्षिक परीक्षेसारखी संधी म्हणून ठाकरेंची शिवसेना याकडे पाहत आहे. विधानसभेची मॅच सपशेल गमावल्यानंतर पालिकेचा चषक पणाला लावण्यात येत आहे. त्यातून ठाकरेंना शिवसेनेचे 'राजकीय आत्मपरीक्षण' करायचे आहे. आपण या लढाईत नेमके कुठे आहोत? हे ठाकरेंच्या शिवसेनेला पाहावेच लागणार आहे.

मित्र असलेल्या पाहुण्यांची काठी यजमानांच्या विरोधात कधी उगारली जाईल, हे सांगता येत नसल्याने पाहुण्यांच्या काठीचा आपल्याला उपयोग होणार नाही, याची शिवसेनेला कल्पना आलेली आहे. त्यातून आपली काठी किती मजबूत आहे हे पाहण्यासाठी महापालिकेच्या निवडणुकांची ही संधी




म्हणून ठाकरेंची शिवसेना याकडे पाहत आहे. ठाकरेंच्या शिवसेनेला यंदाच्या महापालिका निवडणुकीत आपली पालिकांवरची पकड कायम ठेवण्यापेक्षा आपल्या अस्तित्वाची चिंता आहे. स्वत:चे राजकीय अस्तित्व कायम राखणे महत्वाचे आहे. त्यानंतर हे अस्तित्व मजबूत करणे, हा दुसरा टप्पा आहे. त्याही पुढे सत्ता आणि सत्ता कायम राखण्याचे राजकारण हे दूरचे पल्ले आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेच्या हातात यातील काहीच नाही. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेने दिवा स्वप्न पाहाणे सोडून दिले आहे. विधानसभेच्या निवडणुकीत 'राज्यातील वातावरण फिरले असल्याचा भ्रम' किती पोकळ होता, हे शिवसेनेला अनुभवातून आलेले राजकीय शहाणपण आहे. शिवसेनेच्या पराभवामागील कारणे ईव्हीएम, धार्मिक, सामाजिक ध्रुवीकरण अशी असल्याचे शिवसेनेचे म्हणणे होते. या गोष्टी लोकशाहीबाह्य होत्या. हे सगळे शिवसेनेने समजून घेतले आहे. महाराष्ट्रातल्या राजकारणातील स्वत:ची नेमकी जागा ओळखण्याची आता त्यांना गरज आहे. त्यामुळे हा स्वबळाचा नारा ठाकरेंच्या शिवसेनेने देऊ केला आहे. 'शिवसेनेची मुंबई', 'शिवसेनेचे ठाणे', 'शिवसेनेचे कल्याण डोंबिवली' हे सर्व राजकीय भ्रम पाळण्यात ठाकरेंच्या शिवसेनेला आता रस नाही. त्यापेक्षा जमिनीवरच्या वास्तवाला भिडण्याची तयारी ठाकरेंनी केली आहे. मुंबईसह नागपूर महापालिका आम्ही स्वबळावर लढू, काय होईल ते होईल, एकदा आम्हाला पाहायचेच आहे, अशी घोषणा शिवसेनेच्या संजय राऊतांनी करण्यामागे ठाकरेंची शिवसेना आता मित्र, विरोधक आणि स्वत:सह कोण किती पाण्यात आहे? हेसुद्धा पाहायला उतरली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेला पालिकांमधील पराभवाची आता चिंता नाही. राजकारण करून पालिकेची सत्ता मिळवली तरी राज्याचा आणि केंद्रातील भाजपाचा अंकुश अशा सत्तेतही उपद्रव देणाराच असेल हेही शिवसेनेला माहीत आहे.

ठाण्यात एकनाथ शिंदेंनी ठाकरेंच्या अस्तित्वाला आव्हान दिलेले आहे. त्यामुळे मुंबई पालिका राखण्यात ठाकरेंच्या शिवसेनेचे शहाणपण असल्याचे वरकरणी वाटू शकते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने राजकीय सत्तेची बाराखडी पालिकांच्या निवडणुकीतूनच शिकली होती. शिवसेनेने स्वबळाची केलेली घोषणा ही पुन्हा शून्यातून झेप घेण्यासाठी केलेल्या तयारीचा बिगूल आहे. उद्धव ठाकरेंकडे आता गमावण्यासारखे काही नाही, उरल्या सुरल्या वीस आमदारांचे संख्याबळ राज्यात भाजपच्या बलाढ्य बहुमतासमोर असून नसून सारखेच आहे. अशा परिस्थितीत हा राज्यातील सत्तेचा 'सामना' हरल्यातच जमा असल्याने आता आक्रमक खेळ करण्याशिवाय पर्याय नाही. राज्यातील जनमतात आपले स्थान, ताकद ओळखण्यासाठी शिवसेनेने मित्र आपल्या सोबत आहेत हा भ्रम बाजूला केला आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने दिलेला स्वबळाचा हा नारा शिवसेनेसाठी म्हणूनच महत्वाचा आहे. सद्यस्थितीत महापालिकांमध्येही राजकीय सत्ता मिळेल की नाही, हा विषय दुय्यम आहे. आता हा शिवसेनेच्या अस्तित्त्वाचा लढा आहे. मुंबई महापालिकेतील सत्ता शिवसेनेसाठी प्राणवायू इतकीच मोलाची आहे हे खरेच. मात्र त्यासाठी युती करून राजकीय तडजोड करण्यापेक्षा स्वत:चे संघटनात्मक बळ वाढवावे लागेल. ठाकरेंनी या वास्तवाचे भान ठेवणे अधिक महत्वाचे आहे. युती करून महापालिकेतील सत्ता मिळवली तरी मित्रपक्षांसोबत शिवसेनेला राजकीय तडजोडी करावी लागेल. केंद्र, राज्यातील दबावमुळे सत्ता जाण्याची सतत भीती असेल. राज्य आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून अडवणूक केली जाईल. त्यातून पालिकांतील सत्तेचे संतुलन राखताना उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा दम निघून जाणार आहे. हे ठाकरेंच्या शिवसेनेने ओळखले आहे. त्यामुळे आता कोणाच्याही कुबड्यांचा आधार न घेता ठाकरेंच्या शिवसेनेला स्वत:च्या पायावर उभे राहायचे आहे. त्यामुळे त्यांना आता मित्रांना दूर ठेवावे असे वाटत असावे.

# २१ व्या शतकातील अश्मयुगीन मानसिकता!

**मानसा मानसा, कधी व्हशील मानूस**
**लोभासाठी झाला, मानसाचा रे कानूस!**

प्रख्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील या ओळी वारंवार मनात येत आहेत. आजूबाजूला घटनाच तशा घडत आहेत. पुण्यात विमाननगर परिसरात एका प्रसिद्ध आयटी कंपनीत काम करणाऱ्या तरुणीची भररस्त्यात, अनेक लोकांच्या डोळ्यांदेखत हत्या करण्यात आली. त्याच्या हातातील धारदार शस्त्र पाहिल्यावर कोणी पुढे होऊन त्या मुलीला वाचवण्यास धजावले नाही, पण अन्य कोणाला संशयावरून चोप देण्यासाठी सर्वांच्याच बाह्या सरसावतात, हे विशेष!

अशीच एक घटना अलीकडेच मध्य प्रदेशच्या देवासमध्ये उघडकीस आली. लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने आपल्या जोडीदाराची गळा दाबून हत्या केली आणि तिचा मृतदेह फ्रीजमध्ये ठेवून दिला. तब्बल सहा महिन्यांनी ही घटना उघडकीस आली. सुमारे तीन वर्षांपूर्वी दिल्लीत घडलेल्या श्रद्धा वालकर प्रकरणाची आठवण करून देणारी ही घटना आहे. या दोन्ही घटनांतील आरोपींना पोलिसांनी गजाआड केले असले तरी दोन निष्पाप जीव अकारण गेले. शिवाय यादरम्यानच्या काळात अशा अनेक महिला या ना त्या कारणास्तव 'श्रद्धा' ठरतच आहेत. एवढा अमानुषपणा येतोच कुठून, हे न सुटलेले कोडे आहे.

लहानसहान कारणाने किंवा जिथे सामंजस्याने भूमिका घेणे शक्य आहे अशा वेळीही बेपर्वाईने समोरच्याचा जीव घेतला जात आहे. वास्तवात माणसाच्या जीवनाचे मोलच कमी होत चालले आहे की काय, अशी शंका निर्माण होऊ लागली आहे. आपण ज्याला आपले मानतो तोच आपल्या जिवावर उठतो असेच घडत आहे. असे प्रकार पूर्वीही घडत होते. जवळपास ३० वर्षांपूर्वी सुशील शर्मा याने चारित्र्याच्या संशयावरून आपली पत्नी नैना सहानी हिची गोळ्या घालून हत्या केली आणि नंतर तिच्या मृतदेहाचीदेखील अशाच प्रकारे विल्हेवाट लावली. एका राजकीय पक्षाशी संबंधित सुशील आणि नैना यांचे लव्ह मॅरेज झाले होते, पण कालांतराने दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला. तिचे दुसऱ्या कोणाबरोबर तरी संबंध असल्याच्या संशयाचे भूत सुशीलच्या मानगुटीवर बसले आणि त्यातून त्याने अविचारी पाऊल उचलले. २ जुलै १९९५ रोजी नैनाची गोळ्या घालून हत्या केल्यानंतर त्याच्या मालकीच्या रेस्टॉरंटमध्ये तिचा मृतदेह घेऊन गेला आणि मॅनेजरच्या मदतीने तिचे तुकडे करून तंदूरच्या भट्टीत टाकले, पण सतर्क नागरिक आणि पोलिसांमुळे हा सर्व प्रकार उघडकीस आला. आता असे प्रकार वारंवार उघडकीस येऊ लागले आहेत.

एकूणच समाजातील नातेसंबंधांची वीण आता सैल होत चालली आहे आणि माणसाच्या डोळ्यावर व्यवहाराचा चष्मा आला आहे. तो त्याच चष्म्यातून समोरच्याकडे पाहतो आणि त्याच्यापासून आपल्याला काय फायदा होऊ शकतो याचा हिशेब मांडतो. 'पांडव पाच होते आणि कौरव शंभर. जगातील सुष्ट आणि दुष्टांचे प्रमाण बहुधा हेच असावे,' अशा आशयाचे कथन प्रसिद्ध लेखक व. पु. काळे यांचे आहे. त्यानुसार हिशेबाने वागणारे सर्वच जण नसतीलही, पण समोरच्याचा वेळेनुसार वापर करून घेणाऱ्यांची संख्या नक्कीच जास्त आहे.

केरळ उच्च न्यायालयाने सप्टेंबर २०२२ मध्ये याच अनुषंगाने टिप्पणी केली होती. 'यूज अँड थ्रो' या ग्राहक संस्कृतीचा वैवाहिक संबंधांवरही परिणाम झालेला दिसतो, असे न्यायालयाने म्हटले होते. तरुण पिढी वैवाहिक संबंधांकडे गांभीर्याने नव्हे तर स्वार्थीपणाने पाहत असल्याबद्दल खेद व्यक्त केला. विवाहबाह्य संबंधांमुळे जे काडीमोड होत आहेत, ते कदाचित




वाढत्या ग्राहक संस्कृतीच्या प्रभावामुळे असेल आणि त्यातूनच लिव्ह-इन-रिलेशनशिपचे प्रकार वाढत असावेत, असे मत न्यायमूर्ती ए. मोहम्मद मुश्ताक आणि न्यायमूर्ती सॉफी थॉमस यांच्या खंडपीठाने नोंदविले होते. लग्न ही एक वाईट प्रथा असून कोणतेही दायित्व किंवा जबाबदाऱ्यांशिवाय मुक्त जीवन जगण्यासाठी ती टाळली जाऊ शकते, असे आजकालच्या तरुण पिढीला वाटते. पूर्वी 'वाइफ' या शब्दाची फोड 'वाइज इन्व्हेस्टमेन्ट फॉर एव्हर' (गे घ्हनूसहू इदे नें) अशी केली जात होती, पण आता 'वरी इन्व्हायटेड फॉर एव्हर' (दैब गहनू दैने) अशी केली जाते, असेही न्यायालयाने म्हटले होते.

याच मुक्त जीवनाला दिखाऊपणाची जोड देण्यात आली आहे. विशेषत: सोशल मीडियामुळे हा प्रकार वाढीस लागला आहे, असे म्हटले तर ते गैर ठरणार नाही. विचारांना खोली येण्याऐवजी उथळ विचारांचा बोलबाला अधिक होतो. हाच उथळपणा आयुष्याला अस्थिर बनवतो. त्यातच 'लाइफ'मध्ये कितीही प्रॉब्लेम असले तरी सोशल मीडियावर 'लाइक' हवे असतात. पती म्हणून किंवा पत्नी म्हणून आपण किती जबाबदाऱ्या सांभाळतो, जोडीदाराला किती मदत करतो, संसार रथाच्या दोन्ही चाकांची गती सारखी आहे का, याकडे लक्ष देण्याची फारशी कोणाला गरज वाटत नाही. पती-पत्नीमध्ये टोकाचा तणाव असला तरी परदेशात जाऊन हसतमुखाने फोटो काढायचे, ते सोशल मीडियावर टाकायचे आणि लाइक मिळवायचे एवढेच उद्दिष्ट असते. त्यामुळे एवढेच सहजीवन राहिले आहे की काय असे वाटते.

सामंजस्यातून मार्ग निघू शकतो यावर भर देणे आता दुय्यम ठरू लागले आहे. हाच खरा स्मार्टपणा आहे हे जवळपास विस्मृतीत गेले आहे. आता पुणे आणि मध्य प्रदेशातील घटनांचेही तेच म्हणता येईल. पुण्याच्या घटनेतील मृत शुभदा कोदारे हिने मारेकरी कृष्णा सत्यनारायण कनोजा याच्याकडून विविध कारणे सांगत जवळपास साडेचार लाख रुपये उसने घेतले होते, पण वारंवार मागणी करूनही ती पैसे परत करत नव्हती. तिने वडिलांच्या आजारपणाचेही कारण सांगितले होते, पण याची पडताळणी कृष्णाने केली असता वडिलांची तब्येत व्यवस्थित असल्याचे आढळले, अशी दुसरी बाजूही समोर आली आहे. यात तथ्य असेल तर दुखावलेल्या कृष्णाने हे टोकाचे पाऊल उचलले असे म्हणावे लागेल. हत्या ही वाईटच, त्याचे समर्थन करता येणार नाही, पण शुभदाने एकदा का सत्य सांगितले असते तर कदाचित कृष्णाच्या रागाचा पारा हत्या करण्यापर्यंत पोहोचला नसता!

हीच परिस्थिती मध्य प्रदेशातील लिव्ह-इन रिलेशनशिपमधील हत्येची म्हणता येईल. पीडित महिलेचे नाव पिंकी उर्फ प्रतिभा प्रजापती होते आणि ती संजय पाटीदार याच्यासमवेत गेली पाच वर्षे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. संजय पाटीदार हा मुळात विवाहित आहे आणि त्याला दोन मुलेही आहेत. असे असतानाही तिने लग्नासाठी तगादा लावला होता आणि त्यासाठी तो तयार नव्हता. ती आपला पिच्छा सोडत नाही हे पाहून त्याने तिचा गळा दाबून खून केला आणि मृतदेह फ्रीजमध्ये ठेवून तो पळून गेला होता. तो विवाहित आहे आणि तो आपल्या पत्नीला घटस्फोट देणार नाही याची कल्पना प्रतिभाला आली नव्हती का? असा प्रश्न उपस्थित होतो. तिने वेळीच त्याच्यापासून लांब होण्याची गरज होती, पण तसे न केल्याने ती आपला जीव गमावून बसली.

# १२ आमदारांच्या नियुक्तीचा घोळ!

शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ठराविक अंतराच्या काळात धक्के बसण्याचे चक्र अजूनही थांबलेले नाही. विशेष करून न्यायालयीन पातळीवरचा कुठलाही निर्णय शिवसेना ठाकरे गटाच्या पारड्यात पडताना दिसत नाही. गुरुवारीदेखील याचाच प्रत्यय आला. विधान परिषदेवरील राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या नियुक्तीबाबतची ठाकरे गटाची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

यामुळे ठाकरे गटाच्या पदरी पुन्हा एकदा निराशा पडली. याचिका निराधार आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि अमित बोरकर यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळताना नोंदवले. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि महाविकास आघाडी सरकारमध्ये विधान परिषदेच्या १२ आमदारांच्या नियुक्तीवरून रंगलेला वाद चांगलाच गाजला होता. या वादामुळे राज्यपाल नामनिर्देशित १२ आमदारांच्या नियुक्त्या तब्बल ४ वर्षांपासून रखडलेल्या आहेत. तत्कालीन मविआ सरकारने विविध क्षेत्रातील १२ व्यक्तींच्या नावाची शिफारस यादी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे ६ नोव्हेंबर २०२० मध्ये मंजुरीसाठी पाठवली होती. या यादीवर भगतसिंह कोश्यारी जवळपास दोन ते अडीच वर्षे अक्षरश: मांडी घालून बसले होते.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीला बहुमत मिळूनही उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदासह सत्ता वाटपातील तीव्र मतभेदानंतर भाजपसोबत न जाता काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत मिळून महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले होते. या वादाचा वचपा काढण्यासाठीच बहुधा केंद्राकडून कोश्यारींची नियुक्ती झाली होती. राज्यपाल हे केंद्र आणि राज्यातील समन्वयक म्हणून काम करत असले, तरी केंद्रात विरोधी पक्षाच्या भूमिकेत असलेल्या विविध राज्यातील सत्ताधाऱ्यांना त्रास देणे वा अडचणीत आणण्यासाठी राज्यपालांचा कळसूत्री बाहुलीप्रमाणे वापर करून घेण्याची आपल्याकडील परंपरा जुनी आहे.

कोश्यारींनीही या परंपरेचे पाईक होत केंद्राकडून मिळालेली कामगिरी चोख बजावली. अगदीच वर्षभरात हे प्रकरण जनहित याचिकेच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात गेल्यावर राज्यपालांचे विधिमंडळातील रिक्त जागा भरण्याचे कर्तव्य असताना त्यांना याबाबत मौन बाळगण्याचा हक्क आहे का? आणि जर अशा प्रकरणात राज्यपाल निष्क्रिय राहिले तर त्याला घटनापीठापुढे आव्हान देता येते का? किंवा अशा प्रकारची कृती ही घटनाबाह्य आहे की नाही, याचा निवाडा घटनापीठ करू शकते का? असे प्रश्न मुख्य न्यायाधीशांनी राज्यपालांच्या वकिलापुढे उपस्थित केले होते. संविधानाने दिलेल्या सर्वोच्च अधिकारांनुसार राज्यपाल कुणालाही उत्तर देण्यास बांधील नाहीत. त्यामुळे त्यांना न्यायालयही निर्देश देऊ शकत नाही. मात्र परिस्थिती आणि जबाबदारीचे भान ठेवत राज्यपालांनी १२ आमदारांच्या नियुक्तीवर लवकरात लवकर निर्णय द्यायला हवा, अनेक महिने होऊन गेले तरी राज्यपालांनी यादीवर निर्णय घेतलेला नाही. अशा प्रकारे अनिश्चित काळासाठी संविधानिक जागा रिकाम्या ठेवता येणार नाहीत. त्याची कारणमीमांसा होणे गरजेचे आहे, अशा कानपिचक्या देऊन उच्च न्यायालयाने १३ ऑगस्ट २०२१ मध्ये हे प्रकरण निकाली काढले होते. खरे तर न्यायालयाच्या या निरीक्षणाचे घटना तज्ज्ञांकडून विश्लेषण होणे अपेक्षित होते, तसे काही झाले नाही. शिवाय कोश्यारीदेखील या कानपिचक्यांना बधले नाहीत. आपल्या अधिकारांचा यथायोग्य वापर करत राज्यपालांनी ही यादी महाविकास आघाडी सरकारच्या शेवटच्या श्वासापर्यंत दाबून धरली. अखेर मविआ सरकार कोसळून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार सत्तेत आल्यावर कोश्यारींनी ५ सप्टेंबर २०२२ मध्ये ही यादी मांडीखालून बाहेर काढत मागे घेतली. कोश्यारींच्या या निर्णयाला शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे कोल्हापूरचे शहराध्यक्ष सुनील मोदी यांनी जुलै २०२३ मध्ये उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करत आव्हान दिले होते. यावेळच्या सुनावणीत यादी मागे घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात



आल्याचा दावा महायुती सरकारने न्यायालयात केला होता. मंत्रिमंडळाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिकाच निराधार ठरवून न्यायालयाने ती निकाली काढली. दरम्यानच्या काळात कोश्यारींच्या जागी आलेल्या नव्या राज्यपालांनी महायुती सरकारच्या नव्या यादीनुसार १४ ऑक्टोबर २०२४ रोजी १२ पैकी ७ आमदारांची नियुक्ती विधान परिषदेवर अगदी तत्परतेने करून टाकली. यावरही सुनील मोदी यांनी आक्षेप घेत उच्च न्यायालयात दुसरी जनहित याचिका दाखल केली होती. संबंधित प्रकरणातील एक याचिका निकाली निघाली असली, तरी अजून एका याचिकेवर निर्णय प्रलंबित आहे.

शिवाय मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात ठाकरे गट आता सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे समजते. त्यामुळे १२ आमदारांच्या नियुक्तीवरील घोळ इतक्या लवकर संपण्याची चिन्हे नाहीत. या प्रकरणात यादी फेटाळण्याच्याही मुद्यापेक्षा राज्यपालांनी यादी किती काळ प्रलंबित ठेवावी हा मुद्दा कळीचा आहे. सोबतच आधीच्या सरकारची यादी मागे घेत मागून आलेल्या सरकारची यादी मंजूर व्हावी की नाही हादेखील घटनात्मक वादाचा मुद्दा आहे. न्यायपालिका वा कायदेमंडळाने शक्य तितक्या लवकर या विषयाचा सोक्षमोक्ष लावलेला बरा. अन्यथा कोश्यारींनी आपल्या हुशारीने घालून ठेवलेला हा घोळ वा कुप्रथा इथून पुढेही सुरूच राहील.

सार्वजनिक बांधकाम विभाग
**निविदा सुचना क्र.४३ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१ दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामं सा.बां. विभाग सुशिक्षित बेरोजगार अभियंता, यांचेसाठी मागवित आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक ०८/०१/२०२५ ते दिनांक २२/०१/२०२५ दुपारी १५.०० पर्यंत देण्यात यईल. भरुन पाठविलेल्या निविदा २७/०१/२०२५ रोजी त्यादिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्यची किंमत अंदाजित किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Annual Maintenance and minor repair works of Central Canteen / Tea House, Pathology Lab Building, Ellappa Balaram Pavilion and David Sasson Hospital Connecting Passage and Ellappa Balaram Building at Sir J.J. Hospital Compound, Byculla, Mumbai. (Duration Seven Months) | ७४५८२७/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Annual Maintenance and minor repair works of Dinshaw Manekjee Petit Barone Building and Sassoon Building at Sir J.J. Hospital Compound, Byculla, Mumbai. (Duration Seven Months) | ७८०४०९/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Annual Maintenance and minor repairs works of Trimurty Building No.3 at Sir J.J. Hospital Compound. Byculla. Mumbai. (Duration Seven Months) | ५४२६९६/- | ६०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Repairing to Patway tile flooring and chamber, Brick work and Drepaned Garden at Back side to Administrative Office at G.T. Hospital, Mumbai. | ८२७४६९/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Repair to renovation flooring. plaster and painting Gr. floor parking area (garage) High Rise Building G.T. Hospital. Mumbai. | ८००५२६/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Repairing to plaster painting. Door and Window. Pump room Mamron and Low rise Building at G.T. Hospital. Mumbai. | ५०३७६५/- | ६०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Repairs and renovation of Pediatric ward side passage at Main Hospital Building at Sir J.J. Group of Hospital. Mumbai. | ८३२८३०/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Replastering and painting to Cardiology ward side at Main Hospital Building at Sir J.J. Hospital Compound. Mumbai. | ८१८१४१/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Repairs of plaster and paint to Neurosurgery corridor at Main Building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ८१२७४०/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १० | Repairs and renovation of third floor corridor at Main Hospital Building at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ८१४८३३/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ११ | Upgradation and provide HDPE water tank from Anesthesia Department to Gol Garden at Sir J.J. Group of Hospital Compound. Mumbai. | ८४११२१/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १२ | Upgradation and provide HDPE water tank from surgery Dept. terrace to Gol Garden at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ८४६४०२/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १३ | Replastering and painting to Medicine ward side corridor at Main Hospital Building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ७९८९८८/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १४ | Annual Maintenance and minor repair works of Parsi ward and Pathology Deptt. Building at Sir J.J. Hospital Compound, Byculla, Mumbai. (Duration Seven Months) | ८०१८९४/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सुचना फलकावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

जा.क्र.एघ(सा.बां.)वि/निविदा/ ५८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, मुंबई.
दिनांक : ०६/१/२०२५

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५५२२

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# स्वयंविनियामक संस्थेतील प्रतिनिधींची आता दोन वर्षासाठीच नियुक्ती, दोन वर्षानंतर प्रतिनिधी बदलावे लागणार

**मुंबई : राकेश गायकवाड**

महारेरा नोंदणीसाठी नवीन गृहप्रकल्पांना मदत करणाऱ्या स्वयंविनियामक संस्थेतील प्रतिनिधींची नियुक्ती आता केवळ दोन वर्षांसाठीच करण्यात येणार आहे. महारेराने या बाबतचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दोन वर्षे वा त्यापेक्षा अधिक कालावधी कार्यरत असलेले प्रतिनिधी तात्काळ बदला असे लेखी आदेश महारेराने स्वयंविनियामक संस्थांना दिले आहेत.

रेरा कायद्यानुसार विकासकांना, दलालांना आणि नवीन गृहप्रकल्पांना महारेरा नोंदणी बंधनकारक आहे. त्याची प्रक्रिया बरीच मोठी, तांत्रिक असते. अशावेळी प्रकल्प नोंदणी सुलभ करण्यासाठी महारेराकडून विकासकाच्या संघटनांची स्वयंविनियामक संस्था म्हणून नियुक्ती केली जाते. ज्या विकासक संघटनेत किमान ५०० प्रकल्प राबविले जात आहेत, अशा संघटनांची स्वयंविनियामक संस्था म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्या संस्थेतील दोन प्रतिनिधींची महारेरावर नियुक्ती करून त्यांच्या माध्यमातून नोंदणी केली जाते. मात्र त्या अटीत नुकताच बदल करण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेश, पुणे वगळता राज्यभर विकासक संघटनांना ५०० प्रकल्पांच्या अटीची पूर्तता करता येत नसल्याने त्यांची स्वयंविनियामक संस्था म्हणून नियुक्ती होत नाही. परिणामी




त्यांना प्रकल्प नोंदणीसाठी दलालांची मदत घ्यावी लागते. यामुळे त्यांची आर्थिक लुट होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन स्वयंविनियामक संस्थेसाठी ५०० प्रकल्पांऐवजी २०० प्रकल्पाची अट करण्यात आली आहे. आता स्वयंविनियामक संस्थेतील महारेरात नियुक्त प्रतिनिधींचा कालावधी दोन वर्षे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महारेराने घेतला आहे. प्रतिनिधींचा कालावधी अधिक असल्यास महारेरा आणि विकासकांमध्ये महत्त्वाचा दुवा असणाऱ्या या प्रतिनिधींचे हितसंबंध निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रतिनिधींचा कालावधी दोन वर्षे करण्यात आल्याचे महारेराकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्या निर्णयानुसार सध्या नियुक्त असलेल्या सात स्वयंविनियामक संस्थांना दोन वर्षे वा त्यापेक्षा अधिक कालावधी झालेले प्रतिनिधी तात्काळ बदलावेत असे लेखी आदेश महारेराकडून देण्यात आले आहेत. त्याचवेळी महारेरात नियुक्त प्रतिनिधी कायदा, आर्थिक आणि तांत्रिक यापैकी एका विषयातील तज्ज्ञ असणेही आता बंधनकारक करण्यात आले आहे. महारेरा नियुक्त प्रतिनिधींना संबंधित विषयातील माहिती नसल्याने प्रतिनिधींच्या नियुक्तीचा हेतू साध्य होत नाही. त्यामुळे महारेराने हा निर्णय घेतल्याची माहिती महारेराचे अध्यक्ष मनोज सौनिक यांनी दिली. महारेराकडून घेण्यात येणाऱ्या सर्व निर्णयांच्या योग्य अंमलबजावणीसाठी स्वयंविनियामक संस्थांनी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# व्ही. एन. देसाई रुग्णालयातील नूतनीकरणाच्या कामामुळे रुग्णांची गैरसोय

**मुंबई : प्रथमेश चव्हाण**

सांताक्रुझ येथील व्ही. एन. देसाई रुग्णालयाच्या नूतनीकरणाचे काम दोन महिन्यांपूर्वी हाती घेण्यात आले असून त्यासाठी रुग्णालयातील दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यांवरील




शस्त्रक्रियागृह बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे रुग्णांच्या शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात येत आहेत, तर काही रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी अन्य रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येत आहे. एकूणच परिस्थितीत या रुग्णांचे हाल होत आहेत.

दोन महिन्यांपूर्वी व्ही. एन. देसाई रुग्णालयाच्या नूतनीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. तिसऱ्या मजल्यावर मज्जातंतू विभाग आणि अस्थिव्यंग विभागाचे शस्त्राक्रियागृह, तसेच दुसऱ्या मजल्यावर नेत्र विभाग, कान, नाक, घसा विभागाचे शस्त्रक्रियागृह आहे. या मजल्यांच्या नुतनीकरणाला सुरुवात झाल्यापासून हे शस्त्रक्रिया विभाग बंद ठेवण्यात आले आहेत. या विभागांचे शस्त्रक्रियागृह बंद ठेवल्याने रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करण्यात येत नाहीत. परिणामी, रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांवर उपचार करण्यात येत असले तरी शस्त्रक्रियेसाठी रुग्णाला महिनाभरानंतरची तारीख दिली जात आहे. तसेच काही रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी केईएम, कूपर, नायर या रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येत आहे. यामुळे मागील दीड ते दोन महिन्यांपासून शस्त्रक्रिया करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. व्ही. एन.देसाई रुग्णालयात उपचार सुरू केल्यानंतर रुग्णांना अन्य रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी जावे लागल्यानंतर त्यांना पुन्हा सर्व प्रक्रिया करावी लागत आहे, असे काही रुग्णांनी सांगितले. यामुळे वेळ व पैसा वाया जात असल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

# वांद्रे टर्मिनस येथे तीन पिट लाईन्सचे काम प्रगतीपथावर



**मुंबई : विशाल कारंडे**

पश्चिम रेल्वेवरील वांद्रे टर्मिनस येथे तीन अतिरिक्त देखभाल-दुरुस्ती करणारी मार्गिका (पिट लाइन) बांधण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात आवश्यकतेनुसार या पिट मार्गिकेचा वापर वंदे भारत एक्स्प्रेसच्या देखभाल-दुरुस्तीसाठी होऊ शकतो. तसेच सध्या दररोज ९ रेल्वेगाड्यांची तपासणी होत असून, पिट मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यास रेल्वेगाड्यांच्या देखभाल-दुरुस्तीची क्षमता वाढेल.

सध्या वांद्रे टर्मिनस येथे दररोज सरासरी ४६ रेल्वेगाड्यांची ये-जा होते. त्यापैकी नऊ रेल्वेगाड्यांची तीन पिट मार्गिकेवर तपासणी केली जाते. तर, फेब्रुवारी २०२५, मार्च २०२५ आणि मे २०२५ मध्ये प्रत्येकी एक अशा आणखी तीन पिट मार्गिका सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे रेल्वेगाड्यांची देखभाल – दुरुस्तीची क्षमता वाढेल. नवीन पिट मार्गिका कार्यान्वित झाल्यानंतर वांद्रे टर्मिनसवरील रेल्वेगाड्या हाताळण्याची क्षमता प्रतिदिन ३२ रेल्वेगाड्या इतकी होईल, असे पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्याने सांगितले. वांद्रे टर्मिनसवरील नवीन पिट मार्गिकेमुळे टर्मिनसची कार्यक्षमता आणि रेल्वेगाड्या उभ्या करण्याची क्षमता वाढेल, अशी अपेक्षा आहे.

# अग्निशमन दलाच्या ताफ्यात ६८ मीटर उंच शिडी वाहने दाखल होणार

**मुंबई : नितीन देवळेकर**

मुंबई अग्निशमन दलाच्या ताफ्यात आता ६८ मीटर उंचीच्या शिडीची चार वाहने (टर्न टेबल लॅडर) येणार आहेत. याकरीता पालिकेच्या अग्निशमन दलाने निविदा मागवल्या आहेत. उंच शिडीची



वाहने दाखल झाल्यानंतर मुंबई अग्निशमन दलामधील उंच शिड्यांची संख्या १२ होणार आहे. उद्वाहनाची सोय असलेल्या या शिडी वाहनांमुळे उंच इमारतीतील बचावकार्य करण्यास मदत होणार आहे.

मुंबईमध्ये ६० मजल्यांपेक्षाही जास्त उंचीच्या इमारती आहेत. या इमारतींमध्ये आग लागल्यास अग्निशमनाचे काम करताना अग्निशमन दलातील जवानांना जीव धोक्यात घालावा लागतो. मुंबईतील गगनचुंबी इमारतींची संख्या वाढत आहे. त्यामुळे आगीच्या घटनेदरम्यान बचावकार्य करता यावे याकरीता मुंबई अग्निशमन दलाने उंच शिडी असलेली वाहने घेतली आहेत. सध्या अग्निशमन दलाकडे अशी आठ उंच शिडी वाहने आहेत. आता आणखी चार वाहने लवकरच घेण्यात येणार आहेत. ४० मीटर उंचीचे एक शिडी वाहन, ३० मीटर उंचीची दोन शिडी वाहने, ६४ मीटर उंचीची दोन शिडी वाहने, ३७ मीटर उंचीची दोन वाहने आणि ५५ मीटर उंचीचे एका वाहन सध्या अग्निशमन दलाकडे आहे. आता लवकरच ताफ्यात ६८ मीटर उंच शिडीची आणखी चार वाहने दाखल होणार आहेत. उंच इमारतीतील आग विझवणे, इमारतीत अडकलेल्या नागरिकांची सुटका करणे आदी कामांसाठी उंच शिडीचा वापर करण्यात येतो. मुंबईतील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्याचबरोबर उंच इमारतींची संख्याही वाढत आहे. अशा इमारतीत आग लागल्यास या उंच शिडीचा वापर केला जोता. आग विझवण्यासाठी व बचावकार्य करण्यासाठी या शिडीचा वापर करण्यात येतो. इमारतींची संख्या वाढत असल्यामुळे उंच शिडी वाहनांची संख्याही वाढवण्यात येत असल्याची माहिती अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी दिली. ६८ मीटर उंचीची शिडी २१ मजल्यापेक्षाही उंच जाते. गगनचुंबी इमारतीत अग्निरोधक यंत्रणा कार्यरत असल्यास आग विझवण्याचे काम सोपे जाते.

# भांडवली खर्चावरून पालिकेवर आरोप, कंत्राटदारांसाठी तिजोरी खुली केल्याचा रवी राजा यांचा आरोप

**मुंबई : सम्यक कासारे**

मुंबई महापालिकेच्या चालू अर्थसंकल्पातील भांडवली तरतुदींपैकी तब्बल ५२ टक्के रक्कम खर्च झाल्याचे वृत्त प्रसारित झाल्यानंतर या खर्चाबाबत चर्चा सुरू झाली आहे. माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी या खर्चाबाबत शंका व्यक्त केली आहे. डिसेंबर महिन्यापर्यंत जेमतेम ४० टक्के खर्च होतो. यंदा एवढा खर्च झाल्याबद्दल त्यांनी समाजमाध्यमांवरून आक्षेप घेतला आहे. कंत्राटदारांना कामे सुरू करण्याआधीच निधी दिला जात असून त्यामुळे कंत्राटदारांचा फायदा होत असल्याचा आरोपही राजा यांनी केला आहे. चालू आर्थिक वर्षात मुंबई महानगरपालिकेने ५९ हजार ९५४ कोटींचा अर्थसंकल्प सादर केला होता.




यामध्ये भांडवली कामांसाठी तब्बल ३६ हजार कोटींची तरतूद केली होती. डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत ३६ हजार कोटींच्या तरतुदींपैकी १८ हजार कोटी खर्च झाले. म्हणजेच ५२.२३ टक्के तरतूदी खर्च झाल्या आहेत. मात्र या आकडेवारीवर माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी आक्षेप घेतला आहे. पालिकेने जो निधी खर्च केला त्याचे मूल्यमापन कोण करणार असा सवाल त्यांनी केला आहे. मुंबई महापालिकेत सध्या निवडून आलेले नगरसेवक नाहीत. त्यामुळे या खर्चाबद्दल प्रश्न विचारले जात नाहीत. मात्र आपल्या २५ वर्षांच्या कारकीर्दीत डिसेंबर अखेरपर्यंत कधीही खर्च ४० टक्क्यांच्या पुढे गेला नव्हता. यंदा खर्चात एवढी वाढ कशी काय झाली असा सवाल त्यांनी केला आहे. महापालिकेची मुदत संपल्यामुळे सध्या पालिकेत प्रशासकांची राजवट आहे. त्यामुळे कोट्यवधींचे प्रकल्प कोणत्याही चर्चेशिवाय मंजूर केले जातात. पालिकेची मुदत संपलेली असल्यामुळे प्रशासनाच्या कारभारात पारदर्शकता नाही, असाही आरोप त्यांनी केला आहे. कंत्राटदारांना गेल्या काही काळापासून काम सुरू करण्यापूर्वीची प्रारंभिक रक्कम दिली जात आहे. ही चुकीची प्रथा असल्याचा आरोपही राजा यांनी समाजमाध्यमांवरू केला आहे. प्रकल्प सुरू करण्यासाठी लागणारी रक्कम गोळा करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे.

# राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये स्तनपान कक्ष बांधणार, सामाजिक उत्तरदायित्व निधीतून ७० कक्ष साकारणार

**मुंबई : गणेश बागडे**

सार्वजनिक ठिकाणी लहान बाळांना स्तनपान करणे फारच अवघड असते. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी व कार्यालयांमध्ये हिरकणी कक्ष उभारण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये स्तनपान कक्ष (हिरकणी कक्ष) सुरू करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार राज्यभरामध्ये ७० हिरकणी कक्ष बांधण्यात येणार असून, ते सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) साकारण्यात येणार आहेत.

अनेक महिला आपल्या तान्हया मुलांना रुग्णालयात उपचारासाठी घेऊन येतात. त्यावेळी रुग्णालयात असलेल्या गर्दीमुळे मातांना बालकांना स्तनपान देणे शक्य होत नाही. त्यामुळे तान्हे बाळ बराचवेळ उपाशी राहते. महिला व



बाळांची होणारी ही गैरसोय टाळण्यासाठी राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये हिरकणी कक्ष उभारण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यातील एका वैद्यकीय महाविद्यालयामध्ये दोन हिरकणी कक्ष साकारण्यात येणार आहेत. प्रत्येक कक्षासाठी साधारणपणे तीन लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयात उभारण्यात येणाऱ्या या ७० हिरकणी कक्षांसाठी साधारणपणे दोन कोटी ५० लाख रुपये इतका खर्च होणार आहे. हे सर्व हिरकणी कक्ष बांधण्यासाठी मेसर्स बुलसेये मीडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासह पाच वर्षांचा करार करण्यात आला आहे. सीएसआर निधीअंतर्गत स्तनपान कक्ष सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे या हिरकणी कक्षाचा कोणताही आर्थिक भार रुग्णालय प्रशासनावर पडणार नाही.

पान १ वरुन...

## कुणालाही दयामाया...

आज आम्ही मुख्यमंत्री यांना निवेदन द्यायला आलो होतो. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी निवेदन द्यायला आलो होतो पण मुख्यमंत्र्यांकडे वेळ नव्हता. त्यामुळे, आम्ही निवेदन गेटवर चिटकवलं आणि ठिय्या आंदोलन करु अस सांगितले. त्यानंतर, मुख्यमंत्र्यांकडून आम्हाला भेटीची वेळ देण्यात आली, आमचं निवेदनही स्वीकारलं, अशी माहिती रमेश केरे पाटील यांनी दिली. धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यावा, यात लक्ष घातलं तर ठीक आहे नाहीतर मराठा ससामाज मुख्यमंत्री असो किंवा कोणी आम्ही त्यांना फिरु देणार नाही, असा इशारा केरे पाटील यांनी दिला. त्यावर, न्याय मिळवुन देऊ, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी पाटील यांना दिलं आहे.

## नागपूर ते गोवा द्रुतगती...

महायुतीने विधानसभा निवडणुकीआधी अचानक या प्रकल्पाच्या भूसंपादनाची अधिसूचना रद्द केली. एमएसआरडीसीने पर्यावरणासंबंधीचा प्रस्तावही मागे घेतला आणि या प्रकल्पाचे भवितव्य अधांतरी गेले. मात्र प्रकल्प कुठेही रद्द झाला नसून विरोधाच्या पार्श्वभूमीवर संरेखनात बदल करत हा प्रकल्प मार्गी लावला जाईल, यावर एमएसआरडीसी ठाम होते. महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर महायुती सरकारने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी एमएसआरडीसीला दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्य सरकारच्या मंजुरीनंतर एमएसआरडीसीने तात्काळ पाऊले उचलून तीन-चार दिवसांपूर्वीच प्रकल्पाच्या पर्यावरण परवानगीचा प्रस्ताव केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठविल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली. दोन पॅकेजचा प्रस्ताव केंद्राकडे तर दोन पॅकेजचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आले आहेत. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर एमएसआरडीसीकडून पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे ही परवानगी महत्त्वाची मानली जात आहे. या प्रकल्पाला जेथे विरोध आहे, तेथे संरेखनात बदल करून प्रकल्प मार्गी लावला जाईल, असा पुनरुच्चारही गायकवाड यांनी केला.

## अंधेरीतील झोपु योजनेतील...

सर्व झोपडीवासीय पात्र कसे झाले याबाबत जागरूक झोपडीवासीयांनी माहिती अधिकार कायद्यान्वये माहिती घेतली तेव्हा या सर्वांनी नावे बदलून बोगस कागदपत्रे सादर करुन पात्रता करून घेतल्याची गंभीर बाब समोर आली. यामध्ये जिवंत व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र, आधार कार्ड, मतदार पत्र आदी बोगस असल्याची बाब या तक्रारदारांनी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्यांनी गेल्या ऑक्टोबर महिन्यात या २१ जणांची पात्रता रद्द केली. आता आणखी सहा जणांची पात्रता विद्यमान सक्षम प्राधिकारी (तीन) डॉ. मोहन नळदकर यांनी रद्द केली आहे. या प्रकरणी कठोर कारवाईचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिले आहेत.

## टोरेस कंपनीच्या चौकशीत...

फरार असलेला मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) तौसिफ रियाझ हा अल्पशिक्षित होता. त्याने दहावीची परीक्षाही दिली नव्हती. भायखळा येथील आधार केंद्रावर तो ऑपरेटर म्हणून काम करायचा तर, विरार येथे राहणारा होता. त्यामुळे युक्रेनिअन लोकांनी रियाझला कंपनीचा प्रमुख म्हणून संपर्क साधला होता. रियाझनेच त्यांची ओळख सर्वेश सुर्वेशी करून दिली. सर्वेश सुर्वेची कंपनीच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली होती. पोलिसांनी सांगितले की, रियाझला सीईओसारखे दिसण्यासाठी फॉर्मल कपडे घालण्यास सांगितले होते आणि चॅरेडसाठी पैसे देण्यात आले होते. सोमवारी अटक करण्यात आलेला सुर्वे हा केवळ कागदावर संचालक होता आणि त्याला दरमहा २५ हजार रुपये पगार होता. 'शिवाजी पार्क पोलिसांनी व्हिक्टोरियाला आरोपी घोषित केले आहे. तर मीरा रोड येथील नवघर पोलिसांनी ओलेना स्टॉईनला आरोपी केले आहे. आतापर्यंत केवळ तीन जणांना अटक करण्यात आली आहे. गुंतवणुकीच्या फसवणुकीच्या केंद्रस्थानी टोरेसने स्थानिक बाजारातून प्रत्येकी ३०० रुपयाला मॉइसॅ नाइट दगड खरेदी केल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. हे दगड मौल्यवान असल्याचं कंपनीने गुंतवणूकदारांना भासवलं होतं. 'आम्ही कुलाबा येथील तानियाच्या घरातून सुमारे ५.७७ कोटी जप्त केले आहेत. अटक करण्यात आलेले आरोपी सहकार्य करत नाहीत आणि ते आम्हाला युक्रेनियन मुख्य आरोपीचे भाषांतरकार असल्याचे सांगत आहेत', असं पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

## अमित शाह यांची टीका...

या महाविजयाचे शिल्पकार म्हणजे भाजपाचे कार्यकर्ते आणि महाराष्ट्राची जनता आहे असंही अमित शाह यांनी म्हटलं आहे. मी महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानतो कारण सिद्धातांचं राजकारणच चालणार हे जनतेने दाखवून दिलं आहे. माझ्या महाराष्ट्रातल्या लाडक्या बहिणींचे आणि शेतकरी बांधवांचेही मी आभार मानतो. मी एक चित्र पाहिलं होतं त्यात शरद पवार महाराष्ट्रातल्या विविध भागांमध्ये म्हणजेच उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या ठिकाणी काय काय होईल ते पत्रकारांना सांगत होते. आज मी शरद पवारांना सांगू इच्छितो, उत्तर महाराष्ट्रात २२ पैकी २१ जागा आमच्या महायुतीने जिंकल्या, कोकणात १७ पैकी १६, पश्चिम महाराष्ट्रात २६ पैकी २४, पश्चिम विदर्भात १७ पैकी १५, पूर्व विदर्भात २९ पैकी २२, मराठवाड्यात २० पैकी १९ आणि मुंबईत १७ पैकी १५ जागा आम्ही जिंकल्या आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com
**दुरध्वनी क्रमांक ,०२२-२६२३११६४ फॅक्स - २६२०५७८८**

**ई -निविदा सुचना क्र. ४३ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक-२६२३११६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या अनुभवी नोंदणीकृत/ अनोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगांण कामांतर्गत रामबाग सोसायटीजवळील टेकडीचे पुनर्वसन, शांती नगर, अंधेरी (पु) (के पूर्व प्रभाग) | रु. ३,८९,७०,४५१/- |
| २ | खडीपाडा भांडुप (प) तुळशेतपाडा जवळील राजाराम शाळा येथील डोंगराळ भागातील धोकादायक ठिकाणी संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेबाबत. Ch 85 ते 90 (एस - वॉर्ड) | रु. २,०९,९८,४३५ /- |

टिप: वरिल "ई " निविदा सूचना https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेबसाईटवर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. | **१०/०१/२०२५, सकाळी ०९.४५ ते दि २४/०१/२०२५** सायं **१७.००** पर्यंत |
| २ | निविदा पूर्व बैठक -दि. काम क्र. १ | **१७/०१/२०२५ रोजी दुपारी १५.००** वाजता मा. मुख्य अभियंता मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई, बांधकाम भवन, ४ था मजला, फोर्ट, मुंबई.४००००१ यांचे दालनात. |
| | निविदा पूर्व बैठक -दि. काम क्र. २ | **१७/०१/२०२५ रोजी दुपारी १४.००** वाजता मा. अधिक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) मंडळ, मुंबई, बांधकाम भवन, ५ था मजला, फोर्ट, मुंबई.४००००१ यांचे दालनात. |
| ४ | ई-निविदा उघडणे- दि. | **२७/०१/२०२५. सायं १७.०० वाजता** |

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ६५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- - 3 JAN 2025

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५५५३

# वसई, पालघरचे वनक्षेत्र ३५ टक्क्यांनी घटले, भूमाफियांकडून जंगलतोड

■ **वसई : सुचिता देशमुख**

नैसर्गिक वनसंपदा असलेल्या पालघर जिल्ह्यातील वनक्षेत्र तब्बल ८७ चौरस किलोमीटर घटले आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) अहवालातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. भूमाफियांकडून होणारे भराव, बांधकामे आणि झांडाची कत्तल होत असल्याने हिरवा पट्टा नष्ट होऊ लागला असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे राज्यातील २४ जिल्ह्यातील १ हजार ७७८ वनक्षेत्र घटले असून त्यात सर्वाधिक घट ही पालघर जिल्ह्यातील आहे.

पालघरच्या पश्चिमेला सागरी किनारा, पूर्वेकडे डोंगर असल्याने हा जिल्हा निसर्गरम्य आणि पर्यटनासाठी ओळखला जातो. पालघर जिल्ह्यातील नैसर्गिक जंगलामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जात असतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून भूमाफियांनी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करून अनधिकृत बांधकामे करण्यास सुरवात केली आहे. वनखात्याच्या जमिनीवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकामे होत आहे. यामुळे जिल्ह्यातील हिरवा पट्टा नष्ट होऊ लागला आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) या संस्थेने राज्यातील वन्क्षेत्राच्या सद्यस्थितीचा अहवाल प्रसिध्द केला आहे. या अहवालातून हे भीषण वास्तव समोर आले आहे. पालघर जिल्ह्यात वन क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार आहे. पर्यावरणाच्या अनुषंगाने जंगलाचे व पशुपक्ष्यांचे संवर्धन व्हावे, म्हणून वन विभागामार्फत एकूण २४८.३८ चौरस



किलोमीटर राखीव क्षेत्राची घोषणा वनविभागाने केली होती. त्यानुसार जव्हार (११८.२८) डहाणू (४९.१५) आणि थामणी येथे थामणीमध्ये (८०.९५) चौरस किलोमीटर राखीव वन्क्षेत्रे आहेत. याशिवाय पालघर, वसई, तलासरी, डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा तालुक्यात वनहक्क पट्ट्यांचे क्षेत्र २८ हजार ९०० हेक्टर इतके आहे. मात्र भू माफियांनी अनधिकृत बांधकाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणवर जंगलतोड करून वनक्षेत्रावर कब्जा केला आहे. त्यामुळे ८७ चौ.कि.मी. म्हणजेच एकूण वनक्षेत्राच्या ३५ टक्के वनक्षेत्र घटले आहे. वसई विरार मध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत आहे. त्यात सर्वाधित बांधकामे ही वनखात्याच्या जागेवर होत आहेत. राजवली, वाघरळ पाडा येथे वनखात्याच्या जमिनीनवर जंगलतोड करून मोठमोठ्या अनधिकृत वसाहती उभ्या राहिल्या आहेत. महाराष्ट्र देशातील सर्वाधिक म्हणजे १४,५२५ चौ.कि.मी इतके सर्वात जास्त वृक्षाच्छादन आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) अहवालानुसार २०२१ ते २०२३ या दोन वर्षात राज्यातील ३६ पैकी २४ जिल्ह्यांनी एकूण १ हजार ७७८ चौ. कि.मी. खुले जंगल आणि २६७ चौ. कि.मी. झुडपी जंगल गमावले आहे. त्यात सर्वाधिक ८७ चौरस किलोमीटर वनक्षेत्र पालघर जिल्ह्यातील घटले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होणार, अनधिकृत बांधकामांना पाणी न देण्याचा पालिकेचा निर्णय

■ **वसई : विशेष प्रतिनिधी**

शहरातील अनधिकृत बांधकामांना नळ जोडण्या दिला जाणार नसल्याचे पालिकेने जाहीर केले आहे. अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी सर्वोच्चा न्यायालायने मार्गदर्शक तत्वे जाहीर करून भोगवटा प्रमाणपत्र असल्याशिवाय नळ, पाणी, वीज न देण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशाची अंमलबजाणी करण्यासाठी पालिकेने सुरवात केली आहे.

अनधिकृत बांधकामे ही मोठी समस्या आहे. बेकायदा बांधकामामुळे रहिवाशांच्या



जीवाला धोका निर्माण झाला आहे. बांधकामाचा वीज, पाणी, रस्ते यासंबंधी देखील परिणाम होत असतो. त्यामुळे अनधिकृत बांधकामांना रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नुकताच महत्वपूर्ण निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे.बी. पारडीवाला आणि न्यायाधीश आर.माधवन यांच्या खंडपीठाने यासंबंधी जारी केलेली मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहे. भोगवटा प्रमाणपत्र असल्याशिवाय कुठल्याही बांधकांनाना वीज, पाणी मलनिस्सारणाची जोडणी देऊ नये असे या आदेशात म्हटले आहे. अशा बांधकांना बॅंक, वित्तीय संस्था कर्ज देऊ नये तसेच अनधिकृत इमारतीमध्ये कोणत्याही स्वरुपाच्या व्यावसायाला परवानगी देऊ नये असेही न्यायालायने स्पष्ट केले आहे. या निकालानंतर वसई विरार महापालिकेने आढावा बैठक घेऊन ही मार्गदर्शक तत्वे अमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व ९ प्रभाग समितीमधील सहाय्यक आयुक्त, विभाग प्रमुख यांना तशा सुचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी दिली.


२०१८ मध्ये वसई विरार महापालिकेने सर्व अनधिकृत बांधकांना नळजोडण्याचा देण्याचा ठराव एकमताने मंजूर केला होता. घरे अनधिकृत असली तरी त्यात राहणारे अनधिकृत नसतात असा युक्तीवाद महासभेत करण्यात आला होता. त्यानंतर अनधिकृत इमारती आणि बांधकांना नळ जोडण्यात देण्यात येत होत्या. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे पालिकेचा हा ठराव रद्द करावा लागणार आहे. याबाबत कायदेशीर बाबी पडताळल्या जातील असे पालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. २०१७ मध्ये नागपूर खंडपीठाने एका जनहित याचिकेवर निर्णय अनधिकृत बांधकामांना नविन वीज मीटर जोडण्या देता येत नसल्याचे स्पष्ट केले होते. मात्र तरी देखील महावितरण अनधिकृत बांधकांना वीज जोडण्या देत होती.

## कुंडेवहाळ, बंबावीपाडा ग्रामस्थांचे आयुष्य 'माती'मोल; खदाणींच्या धुळीमुळे श्वसनाचे विकार, प्रशासनाचे दुर्लक्ष

■ **पनवेल: सतिश सोनावणे**

**मुंबई आणि नवी मुंबईतील बांधकामांसाठी लागणारे दगड आणि खडी पुरवठा ज्या गावातील खदाणी आणि क्रशरप्लान्टमधून केला जातो, त्या कुंडेवहाळ आणि बंबावीपाडा गावांतील ग्रामस्थ सध्या धुळीच्या लोटांमुळे वैतागले आहेत. अनेकांना श्वसनाचे विकार जडले आहेत. रायगड जिल्हाधिकारी, पनवेलचे प्रांताधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी आमच्यासोबत गावात एक दिवस राहून दाखवावे अशी मागणी कुंडेवहाळ आणि बंबावीपाडा येथील हैराण झालेल्या ग्रामस्थांकडून केली जात आहे.**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रकल्पाचे काम कुंडेवहाळ आणि बंबावीपाडा या गावांच्या हाकेच्या अंतरावर मागील अनेक वर्षांपासून सुरू आहे. या प्रकल्पातील कामांमुळे या परिसरात जिल्हापरिषदेने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या रस्त्यावरून २० ते ४० मेट्रिक टनाची वाहतूक दिवसरात्र सुरू असते. विमानतळ प्रकल्पासोबत मागील अनेक वर्षांपासून गावालगत



१२ क्रशरप्लान्ट सुरू आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने यातील ८ क्रशरप्लान्ट बंद करण्याच्या सूचना वीज महावितरण कंपनीला दिल्या आहेत.

दगड फोडणाऱ्या अनेक खदाणी चालकांनी सरकारी नियम भंग केल्याने त्यांच्यावर सुद्धा प्रांताधिकाऱ्यांकडून कारवाई सुरू आहे. प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी विविध सरकारी अधिकारी कारवाईमध्ये सातत्य असल्याचे सांगत असले तरी येथे राहणाऱ्या ग्रामस्थांची स्थिती अतिशय वाईट आहे. या परिसरातील वायू आणि प्रदूषणाची धोकादायक पातळी असून खदाणी आणि इतर ठिकाणी केलेल्या सुरूंग स्फोटांमुळे निवासी मालमत्तेचे संरचनात्मक नुकसान झाले असून गावकऱ्यांना श्वसनाचे विकार झाल्याचे निवेदन येथील ग्रामस्थांनी रायगड जिल्हाधिकारी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर सरकारी कार्यालयांना दिले आहे. २० डिसेंबरला प्रदूषण नियंत्रण मंडळाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेलचे प्रांताधिकारी यांना लिहिलेल्या सूचनापत्रात या परिसरातील वायू प्रदूषण खराब श्रेणीत असल्याने हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी शासनाने ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याची सूचना केली होती. यामध्ये बांधकाम व इतर विध्वंसांतून महामार्ग वाहतूक, वाहनांची हालचाल, रस्त्यावरील धूळ, स्मशानभूमी, बेकरी येथील नियंत्रणासाठी पाऊले उचलल्याची सुचविले होते. ज्या प्राधिकरणांच्या अखत्यारीत विविध महामार्ग आणि रस्त्यांचे नियंत्रण येते ते संबंधित रस्त्यांची यंत्र किंवा मनुष्यबळाद्वारे सखोल स्वच्छता करावी, तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या मुख्य जंक्शनवर पाणी शिंपडून स्वच्छ करावे, असेही प्रदूषण नियंत्रण मंडळाने म्हटले होते.

## दहा वर्षापासून रखडलेल्या खानिवडे रुग्णालयाच्या कामाला गती, ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय ; १३.३२ कोटींचा खर्च

■ **वसई : सुचिता देशमुख**

मागील दहा वर्षांपासून रखडलेल्या खानिवडे येथील ग्रामीण रुग्णालयाच्या कामाला अखेर गती मिळाली आहे. ३० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. लवकरच हे काम पूर्ण केले जाणार आहे.मुंबई अहमदाबाद महामार्गावर घडणारे अपघातग्रस्त नागरिक व या भागाला लागूनच असलेल्या गावपाड्यातील नागरिकांची वैद्यकीय उपचार मिळविण्यासाठी परवड होत होती. हीच समस्या लक्षात घेऊन २०१४ मध्ये महामार्गावरील खानिवडे येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी सव्हे क्रमांक १४८ व १६२ मधील ०.९९ हेक्टर इतकी जागा ही निश्चित करण्यात आली होती.मात्र या रुग्णालयाच्या कामात वनविभागाच्या जागेचा हस्तांतरण प्रश्न, आराखड्यातील बदल,प्रशासकीय मंजुरी साठी झालेला विलंब अशा अनेक अडचाणी निर्माण झाल्या होत्या. जवळपास दहा वर्षे या रुग्णालयाचे काम रखडले होते.

या बांधकामाच्या आराखड्याच्या कामाला शासनाची प्रशासकीय मान्यता मिळताच निविदा प्रक्रिया पूर्ण करून या कामाची सुरुवात



सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे.अधिक्षक अभियंता, संकल्प चित्र मंडळ, कोकण भवन, यांच्या मार्फत ही इमारतीचे आरसीसी आराखडा तपासून घेण्यात आला आहे. उभारण्यात येणारे रुग्णालय हे दोन मजली असून त्याचे क्षेत्र ३ हजार ३९९ चौरस मीटर इतके आहे.

# स्बळाच्या नाऱ्यानंतर शिंदे गटाकडून ठाकरे गटावर टिकेचे बाण

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या नेत्यांनी आगामी महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याचा नारा दिला असून याच मुद्द्यावरून आता शिवसेना (शिंदे गट) नेत्यांनी ठाकरे गटावर टिकेचे बाण सोडले आहेत. स्वबळावर निवडणुक लढणार असल्याचे सांगत कॉंग्रेसला शिव्या देणे सुरू केले असून सरड्याप्रमाणे रंग बदलण्याचे काम उबाठाने सुरू केले आहे. तसेच स्वबळावर लढले तर, दोन अंकी आकडा एक अंकावर येईल, अशी टिप्पणीही शिंदे गटाच्या नेत्यांनी केली आहे.

मुंबईपासून ते नागपूरपर्यंत सर्व महापालिकेच्या निवडणुका आम्ही स्वबळावर लढवणार आहोत, अशी घोषणा शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांनी केली आहे. या घोषणामुळे महाविकास आघाडीत फूट पडणार असल्याचे चित्र आहे. असे असतानाच, ठाकरे गटाचे नेते राऊत यांनी जाहीर केलेल्या भुमिकेवरून विरोधी पक्षाने ठाकरे गटावर टिका करण्यास सुरूवात केली आहे.




उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापुर्वीच महायुतीमध्ये निवडणुका लढविणार असल्याची भुमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे महापालिका निवडणुका महायुतीतच लढल्या जातील, ही काळ्या दगडावरची भगवी रेघ आहे, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. तसेच उबाठाने स्वबळावर निवडणुक लढविली तर, त्यांचा दोन आकडी अंक एकवर आल्याशिवाय राहणार नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत आणि उबाठा महापालिकेच्या सत्तेशिवाय जगू शकत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक होत आहे, याची आठवण त्यांना मुंबई महापालिका निवडणुकीच्या धर्तीवर झाली आहे. यामुळेच उद्धव ठाकरे हे सर्व नेते घेऊन पाहणी करण्याकरीता गेले होते. आधी नाक घासून बाळासाहेबांची माफी मागा आणि मगच स्मारकामध्ये पाऊल ठेवा. कारण तुम्ही माती खाल्ली सत्तेच्या लोभापाई, अशी टिका शिवसेना (शिंदे गट) खासदार नरेश म्हस्के यांनी केली. सत्तेच्या खुर्चीसाठी कॉंग्रेसच्या दारी गेले. सोनिया गांधी यांच्या उंबरठ्यावर जाऊन बसले. वीर सावरकर यांच्या अपमान करणाऱ्या राहुल गांधी यांना मिठ्या मारत होते. आता त्यांनीच स्वबळावर निवडणुक लढणार असल्याचे सांगत कॉंग्रेसला शिव्या देणे सुरू केले असून सरड्याप्रमाणे रंग बदलण्याचे काम उबाठाने सुरू केले आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

राजकारणामध्ये कोणीही कोणाचा कायमचा शत्रू नसतो आणि कुणी कुणाचा मित्र नसतो. यामुळेच गेल्या अडिच वर्षात आपण पाहिले की कधी महाविकास आघाडी सत्तेवर आले तर कधी महायुतीचे सरकार सत्तेवर आले. ठाण्यात एक परंपरा राहिली आहे.

# वलसाड फास्ट पॅसेंजरचे दैनंदिन प्रवासी हवालदिल, जागा पकडण्यासाठी घोलवड पर्यंत धाव

■ **पालघर : सचिन कदम**

**वलसाड फास्ट पॅसेंजरचे डबल डेकर डबे बदलून त्याच्या बदल्यात सिंगल डेकर डब्यांमधून प्रवास करताना दैनंदिन प्रवासी हवालदील झाल्याचे दिसून आले. पालघर, केळवा रोड येथील अनेक प्रवाशांनी आपल्याला व आपल्या समूहाला जागा मिळावी याकरिता चक्क वाणगाव व घोलवड पर्यंत जाण्याचे पसंद केले. तरी देखील बहुतांश प्रवाशांना उभ्याने गर्दीत प्रवास करणे भाग पडले असून आज (सोमवारी) गाडी मध्ये गर्दी आणि गोंधळाचे वातावरण होते.**

वलसाड फास्ट पॅसेंजरचे डबल डेकर डबे ५ जानेवारी (रविवार) पासून बदलण्यात आले. मात्र आज कामकाजाचा पहिला दिवस असल्याने या डब्यांमध्ये दैनंदिन प्रवाशांच्या समायोजनाबाबत सर्वस्तरांमध्ये उत्सुकता होती. आपल्याला व आपल्या समूहाला व्यवस्थित जागा मिळावी यासाठी काही हौशी प्रवासी यांनी घोलवड, डहाणू व वाणगाव येथे जाऊन जागा पकडण्याचा (आरक्षित करण्याचा) प्रयत्न केला. मात्र काहींना जागा मिळाल्या तरीही बहुतांश दैनंदिन प्रवाशांना उभ्याने प्रवास करणे भाग पडले.

वलसाड चे डबे बदलल्याने प्रवाशांमध्ये असणारा असंतोष उफळून येईल ही शक्यता पाहता सर्व रेल्वे स्थानकांवर जीआरपी, आरपीएफ कर्मचारी तैनात ठेवण्यात आले होते. याखेरीज आरपीएफ कर्मचारी व गुप्तचर विभागाचे कर्मचारी वेगवेगळ्या डब्यांमध्ये साध्या देशामध्ये कार्यरत असल्याचे दिसून आले. बोईसर, पालघर, केळवा रोड व सफाळा येथे गाडी आल्यानंतर आपल्या समूहातील मित्रपरिवार कुठे बसला आहे हे शोधण्यासाठी अनेकांची तारांबळ उडाली. तर इंजिन पासून पहिल्या आठ डब्यांमध्ये प्रवाशांना प्रवेश घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागले. विशेष म्हणजे या गाडीतुन भाजीपाला घेऊन उपनगरात जाणाऱ्या विक्रेतांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. गाडीच्या मागील भागात असणाऱ्या सात सर्वसाधारण डब्यांमध्ये पालघर नंतर तुडुंब गर्दी झाली.

इतर वेळी नियमित येणारी ही दैनंदिन प्रवाशांची गाडी आज सुमारे अर्धा तास विलंबाने



पालघरला आल्याने अनेक प्रवाशांनी त्यापूर्वी विलंबाने धावणाऱ्या एका जलद गाडीमधून प्रवास करण्याचे पसंद केले. तर डब्यांची क्षमता निम्म्यावर आल्याने डब्यात प्रवेश घेणे, डब्यातील वरच्या बर्थ वर बसण्यासाठी कसरत करावी लागली. नव्याने जोडण्यात आलेले डबे अस्वच्छ असल्याचे व त्यामध्ये ढेकूण असल्याच्या तक्रारी अनेक प्रवाशांनी केल्या तर या सिंगल डेकर डब्यांमधील शौचालय अस्वच्छ असल्याचे तसेच त्यामध्ये पाणी नसल्याचे प्रवाशांकडून माहिती मिळाली. गाडी येण्यापूर्वी दैनंदिन प्रवासांमध्ये एक उत्सुकता तसेच हवालदिलपणा दिसून आला तर प्रवासादरम्यान जवळपास सर्व डब्यांमध्ये गर्दी व गोंधळाचे वातावरण असल्याचे प्रवाशांकडून सांगण्यात आले.

या गाडीमध्ये १२ व १३ वा डब्बा महिलांसाठी राखीव असून सफाळे येथे फलाटाचे काम अपूर्ण राहिल्याने दोन फलटा दरम्यान हा डबा आल्याने वृद्ध व गर्भवती महिलांना या डब्यांमध्ये प्रवेश करणे जिकरीचे ठरले. फलाटाचे काम पूर्ण होईपर्यंत वलसाड फास्ट पॅसेंजर मध्ये सफाळे येथून वलसाड फास्ट पॅसेंजर पकडणे आव्हानात्मक ठरणार आहे. वलसाड फास्ट पॅसेंजर मध्ये महिलांसाठी तसेच प्रथम दर्जाच्या सीजन तिकीट धारकांसाठी प्रत्येकी एक डबा आरक्षित आहे. करोनानंतर रेल्वे सेवा पूर्ववत झाल्यानंतर सर्वसाधारण डब्यांमध्ये दैनंदिन प्रवासी (मंथली सीजन तिकीट – एमएसटी) साठी असणारे आरक्षण बंद करण्यात आले होते. तरी देखील अनेक वर्ष डब्यातील विशिष्ट भागात आपण अनेक वर्षांपासून प्रवास करत असल्याचा दाखला देत अलिखित आरक्षण पद्धती कार्यान्वित होती. यामुळे अनियमित किंवा नव्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दैनंदिन प्रवासी हे दादागिरी करत बसलेल्या आसनावरून इतर प्रवाशांना उठवत असत. हीच आरक्षण पद्धती कायम ठेवण्यासाठी काही मंडळी घोलवड, डहाणू व वाणगाव येथे जाऊन आपल्या मित्र परिवाराच्या समूहासाठी जागा आढळण्याचा प्रयत्न केला होता.

महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां)विभाग, मुंबई - ४००००१.**

Email : :- intergratedmumbai.ee@mahapwd.com | ☎ क्रमांक:-०२२-२२०१६९७४/२२०१६९७६

**ई-निविदा सुचना क्र.०२ सन २०२४-२५..**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र.०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत **अनुभवी कंत्राटदार व पुरवठादार** यांच्या कडून खालील कामाकरीता "ड" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) पध्दतीने मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| 1 | Providing and erecting of mandap, VIP chair, leather sofa, table, partition and platform for Organ Donation camp in front of Gol Garden at Sir J.J.Hospital compound, Mumbai.(IHG-314) | Rs. 25,45,571/- |
| 2. | Providing and Supplying material to Grand Medical collage Gymkhana at Marine Lines(Waterproof Mandap, stage, Partition, Baragating and chair)(IHG-315). | Rs. 26,37,446/- |
| 3 | Providing and Supplying material to open area at Sir J.J.Hospital compound, Mumbai.(IHG-316) | Rs. 29,68,059/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :-दि. १३ -०१-२०२५ ते दि. २७-०१-२०२५ रोजी १५.०० पर्यंत.

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास): दि. २८ -०१-२०२५. रोजी १७.०० वाजता.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदा सर्व माहीती उपलब्ध आहे.

१)http//mahapwd.com

२)http//mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई-०१ कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र. काअ/एथवि/भांडार/ई-निवीदा/८८**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,**
**बांधकाम भवन, २ रा मजला,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**
**दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६**
दिनांक :-०८/०१/२०२५

**(बी. एस. फेगडे)**
**कार्यकारी अभियंता,**
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
**मुंबई-४०० ००१.**

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५५८८**

# डिजिटल स्वाक्षरीअभावी पात्र फेरीवाल्यांना परवाने, ओळखपत्र परवान्यांचे वितरण रखडले

■ पिंपरी-चिंचवड : शकिल शेख

शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांच्या सर्वेक्षणाला दोन वर्षे पूर्ण होऊनही पात्र फेरीवाल्यांना परवाने, ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. केवळ डिजिटल स्वाक्षरीअभावी परवान्यांचे वाटप रखडले आहे. शहरातील १५ हजार १३ फेरीवाले परवान्यापासून वंचित आहेत. दुसरीकडे परवाना नसल्याने महापालिका प्रशासन कारवाईचा बडगा उगारत आहे. त्यामुळे हातावर पोट असलेल्या फेरीवाल्यांना जगण्याची भ्रांत निर्माण झाली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेने फेरीवाला कायद्यानुसार १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांचे सर्वेक्षण केले. त्यात एकूण १८ हजार ६०३ फेरीवाल्यांची नोंदणी झाली. छाननी, तसेच सुनावणीत कागदपत्रांची पूर्तता न केल्याने काही अर्ज बाद करण्यात आले. शहरातील एकूण १५ हजार १३ फेरीवाले पात्र ठरले आहेत. मात्र, सर्वेक्षण होऊन दोन वर्षे झाले, तरी परवाना,




ओळखपत्र व प्रमाणपत्र दिले गेलेले नाही. महापालिकेच्या भूमी आणि जिंदगी विभागाने, तसेच, सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या नोंदणीसाठी एक हजार रुपये शुल्क आकारले आहे. ओळखपत्र व प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी २०० रुपये शुल्क आहे. असे एकूण एक हजार ४०० रुपये शुल्क ऑक्टोबरमध्ये घेतले. शहर फेरीवाला समितीच्या आठ सदस्यांची निवडणूक २० ऑक्टोबरला झाली. समितीचे आठ सदस्य निवडून आले. तरीही, अद्याप फेरीवाल्यांना परवाना, ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. दुसरीकडे ओळखपत्र, परवाना नसल्याने महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाकडून त्रास दिला जात असल्याने फेरीवाल्यांनी नाराजी व्यक्त केली. पात्र फेरीवाल्यांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी, सर्वेक्षण करताना मुदतवाढही देण्यात आली होती. त्यानंतर निवडणूक आचारसंहिता लागली. त्यामुळे प्रमाणपत्र देण्यास विलंब झाला आहे. क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रक्रिया केली जात आहे. परवाना, ओळखपत्र लवकरच देण्यात येणार असल्याचे भूमी आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त मुकेश कोळप यांनी सांगितले. फेरीवाल्यांचे सर्वेक्षण होऊन दोन वर्षे पूर्ण झाले. मात्र, अद्यापही परवाने दिले नाहीत. सर्वेक्षण करताना सर्व कागदपत्रे तपासली आहेत. त्याच वेळी ओळखपत्र व परवाना दाखला देण्यास काय अडचण होती? शुल्क भरल्याची पावती दाखविल्यानंतरही अतिक्रमण कारवाई केली जाते.

# बृहतसूचीवरील पात्र भाडेकरुंना सशर्त ताबा, म्हाडा उपाध्यक्षांचा निर्णय

■ मुंबई : सम्यक कासारे

म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या बृहतसूची सोडतीतील पात्र भाडेकरूंच्या निकटच्या वारसांना आता सदनिकेचा सशर्त ताबा देण्याचा निर्णय म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी घेतला आहे. मृत भाडेकरुंचे एकापेक्षा अधिक वारस असल्यास सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र आवश्यक असते. ते प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सहा ते नऊ महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे ताबा घेण्यास विलंब होत असल्याने जयस्वाल यांनी सदनिकेचा सशर्त ताबा देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार लाभार्थ्यांनी ताबा मिळाल्यापासून सहा महिन्यात वारस प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल. या निर्णयामुळे वारसांना, लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या संक्रमण शिबिरार्थींना कायमस्वरुपी हक्काची घरे देण्यासाठी बृहतसूची तयार केली जाते. सोडतीद्वारे




बृहतसूचीवरील संक्रमण शिबिरार्थींना घरांचे वितरण केले जाते. संक्रमण शिबिरात ३० ते ५० वर्षांपासून उपकरप्राप्त इमारतीतील मूळ भाडेकरु राहतात. अशावेळी अनेक मूळ भाडेकरूंचा मृत्यू झालेला असतो. अशा प्रकरणांमध्ये मृत भाडेकरूंचे पत्नी वा मुले असे एकापेक्षा अधिक वारस असल्यास त्यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र बंधनकारक असते. ते घेण्यासाठी सहा ते नऊ महिन्यांचा कालावधी लागतो. परिणामी घराच्या वितरणास विलंब होतो. ही बाब लक्षात घेता सदनिकेचे वितरण वेगाने व्हावे यासाठी आता बृहतसूचीवरील घरांचे सशर्त वितरण वारसांना करण्याचा निर्णय जयस्वाल यांनी घेतला आहे. बृहतसूचीवरील मूळ भाडेकरूच्या निकटचे वारस (मुलगा, मुलगी, आई-वडील किंवा पत्नी) असल्यास इतर नातेवाईकांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन सदनिकेचा सशर्त ताबा देता येईल.

# राष्ट्रवादीच्या मंत्र्यांचा जनता संवाद उपक्रम; आठवड्यातील तीन दिवस मंत्री पक्षाच्या मुख्यालयात

■ मुंबई : विशाल कारंडे

विधानसभा निवडणुकीतील यशानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) जनाधार वाढवण्यावर भर दिला असून त्यासाठी जनता संवाद उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पक्षाचे मंत्री आठवड्यातून तीन दिवस प्रदेश कार्यालयात उपस्थित राहून पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेशी संवाद साधून त्यांचे प्रश्न सोडवणार आहेत.

मंत्रालयासमोरील 'राजगड' या पक्षाच्या प्रदेश कार्यालयात राष्ट्रवादीचे मंत्री मंगळवार ते गुरुवार असे उपस्थित राहणार आहेत. प्रत्येक मंत्र्यांना दिवस आणि वेळ नेमून दिली आहे. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन



मुश्रीफ हे मंगळवार ते गुरुवार असे आठवड्यातील तीन दिवस सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जनतेला भेटतील. प्रत्येक मंगळवारी अन्न आणि नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे तसेच युवक, क्रीडा कल्याण आणि अल्पसंख्याक विकासमंत्री दत्तात्रय भरणे त्याचबरोबर मदत आणि पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील हे प्रदेश कार्यालयात उपस्थित राहणार आहेत.

बुधवारी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ आणि महिला व बालविकास आदिती तटकरे तर गुरुवारी राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे पक्ष कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांना भेटून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) काही खासदार व आमदारांना तुम्ही फोन केला होता, असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. त्या प्रकरणी राष्ट्रवादीचे (अजित पवार) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले. आम्ही कोणी त्या पक्षातील आमदार-खासदारांना फोन केलेला नाही. आमच्या संपर्कात त्यांचे कोणी नेते नाहीत. त्यांच्या पक्षात अस्वस्थता आहे. ती लपवण्यासाठी आमच्यावर असे आरोप केले जात आहेत.

# एक्वा मरीन ग्लोबल कल्चर कंपनीची फसवणूक

■ पनवेल : आकाश कांबळे

मुंबई आणि नवी मुंबईतील नागरिकांना मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून एक्वा मरीन ग्लोबल कल्चर कंपनीने फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात अंधेरीतील गुंतवणूकदार मोहम्मद इस्माईल शेख यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. कंपनीने महिन्याला १५ टक्के परताव्याचे आश्वासन देत शेख यांच्याकडून १४ लाख रुपयांची गुंतवणूक घेतली होती. सुरुवातीचे काही महिने परतावा दिल्यानंतर कंपनीने तो थांबवला. तक्रार दाखल झाल्यानंतर खारघर




पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास अंधेरी एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग केला. मुंबई आणि नवी मुंबई पोलिसांनी कंपनीचे मालक विनय कांबळे यांना ताब्यात घेऊन मुंबई पोलिसांच्या स्वाधीन केले.

# मालाड मीठ चौकी उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची घोषणा

■ मुंबई : राकेश गायकवाड

मालाडमधील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा असा मीठ चौकी उड्डाणपूल रविवारपासून जनतेसाठी खुला करण्यात आला. बांधकाम पूर्ण झाल्यामुळे हा पूल उद्घाटन सोहळ्याशिवाय वाहतुकीसाठी खुला करण्यात येत असल्याची घोषणा केंद्रीय मंत्री आणि उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील खासदार पीयूष गोयल यांनी केली. रविवारी त्यांनी या पुलाची पाहणी केली व पूल वाहतुकीसाठी



खुला करण्याचे निर्देश दिले. मुंबई महानगरपालिकेने मालाड पूर्व – पश्चिम परिसर जोडण्यासाठी मीठ चौकी पूल उभारला. मालाड पश्चिमेला असलेल्या मीठ चौकी जंक्शनवर टी आकाराच उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या पुलामुळे मार्वेकडून पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे अर्थात पश्चिमेकडून पूर्वेकडे जाता येणार आहे. मार्वे ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारी एक मार्गिका आणि मार्वेकडून गोरेगावकडे जाणारी दुसरी मार्गिका अशी उड्डाणपुलाची रचना आहे. त्यापैकी मार्वे ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारी एकेरी मार्गिका ६ ऑक्टोबर २०२४ पासून वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे.

# जे. जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे तीन महिन्यांचे विद्यावेतन रखडले, निवासी डॉक्टर मानसिक तणावाखाली

■ मुंबई : सम्यक कासारे

निवासी डॉक्टरांना नियमित विद्यावेतन देण्याच्या सूचना तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये दिल्या होत्या. मात्र त्यानंतर अवघ्या दोन महिन्यानी म्हणजे ऑक्टोबरपासून आतापर्यंत जे. जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना विद्यावेतन मिळालेले नाही. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागाने मुख्यमंत्र्यांच्या सूचनेला केराची टोपली दाखविल्याचे दिसून येत आहे. राज्यातील निवासी डॉक्टरांची संघटना असलेल्या मार्डने विविध मागण्यांसाठी ऑगस्टमध्ये राज्यभर आंदोलन केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनाचा प्रश्न मार्गी लावताना नियमित विद्यावेतन देण्याच्या सूचना वैद्यकीय शिक्षण विभागाला दिल्या होत्या. मात्र त्यानंतर अवघ्या दोन महिन्यानंतर म्हणजे ऑक्टोबरपासून आतापर्यंत जे. जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना विद्यावेतन मिळालेच नाही. तसेच त्यापूर्वीही निवासी डॉक्टरांना एक महिना विलंबाने विद्यावेतन मिळत होते. मात्र ऑक्टोबरपासून त्यांना विद्यावेतन देण्यात आलेले नाही. ऑक्टोबर




ते डिसेंबर असे तीन महिन्यांचे विद्यावेतन न मिळाल्याने डॉक्टरांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यांना दैनदिन खर्च भागविण्याबरोबरच रोजच्या जेवणाची सोय करणे अवघड झाले आहे. अनेक निवासी डॉक्टरांची घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना मूलभूत खर्च भागविणे अवघड झाले आहे. विद्यावेतन नियमितपणे मिळावे यासाठी निवासी डॉक्टरांची संघटना असलेल्या 'मार्ड'ने वैद्यकीय शिक्षण विभागाकडे वारंवार पाठपुरावा केला. विद्यावेतन न मिळाल्याने निवासी डॉक्टर प्रचंड तणावाखाली वावरत असून, त्यांना मानसिक तणावाला सामोरे जावे लागत आहे.

त्यामुळे या समस्येकडे लक्ष देऊन निवासी डॉक्टरांना तातडीने विद्यावेतन द्यावे, अशी मागणी 'मार्ड'ने सरकारकडे केली आहे. रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या डॉक्टरांना त्यांच्या हक्काच्या मागणीसाठी वारंवार संपावर जावे लागत आहे, हे निराशाजनक आहे. आरोग्य सेवेमध्ये अत्यावश्यक भूमिका बजावणाऱ्या निवासी डॉक्टरांनी मानसिक तणावाखाली येऊन आत्महत्या केल्यास याला जबाबदार कोण?

# प्रवाशाने घेतला सुरक्षा बलाच्या जवानाचा चावा

■ वसई : विशेष प्रतिनिधी

अंपगांच्या डब्यात चढलेल्या एका नशेबाजाला हटकल्यानंतर त्याने चक्क सुरक्षा बलाच्या जवानाचा चावा घेतला. त्याला डब्यातून बाहेर काढण्यात सुरक्षा बलाच्या जवानांना मोठी कसरत करावी लागली. वसई रोड रेल्वे स्थानकात रविवारी सकाळी ही घटना घडली. रविवारी सकाळी दादरवरून डहाणूला जाणारी लोकल निघाली होती. वसई रोड रेल्वे स्थानकात ती सकाळी ९ वाजून ५७ मिनिटांनी पोहोचली. यावेळी फलाटावर रेल्वे सुरक्षा बलाचे (आरपीएफ) भरारी पथक तैनात होते. त्यावेळी एक तरुण अपंगांच्या



डब्यात आढळून आला. त्यांनी त्याला खाली उतरण्यास सांगितले. मात्र त्याने नकार देत प्रतिकार केला. यावेळी इतरही जवान मदतीला आले आणि त्यांनी या इसमाला खाली खेचले. मात्र त्याने एका जवानाच्या हाताला आणि पायाला चावा घेतला.


## महाराष्ट्र शासन

### इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

### ई -निविदा सुचना क्र. ६२ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथे वार्षिक देखभालाची कामे करणे. (६ महिने) | ३१.८८ |
| २ | बी. टी. मार्ग मुंबई येथील विस्तारीत इमारत क्र. २ (SB-I & II) येथील फॉरेन सर्विस ऑफीस येथे नुतनीकरण करणे. | १९.७७ |
| ३ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील रुम नं. ४२३ येथे दुरुस्ती करणे. | १५.३० |
| ४ | महापालिका मार्ग मुंबई येथील चिफ मॅजिस्ट्रेट कोर्ट येथील पीडब्ल्यूडी सेवा केंद्र/ कार्यालय येथे फर्निचर रंगकाम, प्लास्टर, फ्लोरींगची दुरुस्ती करणे. | १६.८५ |
| ५ | महापालिका मार्ग मुंबई येथील आझाद मैदान पोलिस स्टेशन लॉकअप, बाथ, अंतर्गत प्लास्टर, रंगकाम व दुरुस्ती करणे. | १६.११ |
| ६ | शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट येथील जुने जकात घर मुंबई डी. डी इमारत २ मजल्यावरील कार्यालय, एनएसईएल कॅबिन, डेप्युटी कलेक्टर व कॉम्पेटंट अधिकारी, प्रसाधनगृह, सॅनिटरी फिटींग, दरवाजे, खिडक्या, फॉल्स सिलिंग इ. प्लास्टर, फ्लोरींग, पार्टीशन, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ३१.९८ |
| ७ | मादाम कामा रोड मुंबई येथील नविन प्रशासकीय इमारत पीडब्ल्यूडी उपविभाग, विभाग कार्यालय, गोडाऊन येथे वार्षिक देखभालाची कामे करणे. | १७.१२ |
| ८ | एन. सी. सी. इमारत मुंबई येथील दरवाजे, खिडक्या, सुतार मटेरीअल, सॅनिटरी, पाणी पुरवठा फिटींग, प्लंबींग मटेरीअल इ. रंगकाम, प्लास्टर, दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | १२.६२ |
| ९ | सिटी सिव्हील कोर्ट इमारत मुंबई येथील तळमजला ते ४ मजल्यावरील आणि सेंट्रल हॉल येथील मिनिस्टर चेंबर व कार्यालय नुतनीकरण करणे. | ११.३८ |
| १० | एक्सप्लानेड मुंबई सीएमएम कोर्ट मुख्य इमारत येथील वॉटर प्रुफिंगचे काम करणे. | १०.४१ |
| ११ | जुने सचिवालय मुख्य इमारत मुंबई येथील दरवाजे, खिडक्या, सुतार मटेरीअल, सॅनिटरी, पाणी पुरवठा फिटींग, प्लंबींग मटेरीअल इ. रंगकाम, प्लास्टर, दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | १७.९४ |
| १२ | एल्फीस्टन टेक्नीकल हायस्कूल मुंबई येथील नविन पॉलिटेक्नीक इमारत येथे ॲल्युमिनिअम खिडक्या, प्लास्टर, रंगकाम व दुरुस्ती करणे. | १३.११ |
| १३ | एल्फीस्टन टेक्नीकल हायस्कूल मुंबई येथील अंतर्गत कॅबिन, फॉल्स सिलिंग, प्रसाधनगृह, फ्लोरींग दुरुस्ती करणे. | १६.२७ |
| १४ | एल्फीस्टन टेक्नीकल हायस्कूल मुंबई येथील विविध लिफ्ट व जिना लॉबी दुरुस्ती व नुतनीकरण करणे. (तळमजला ते १ मजला) | २१.८६ |
| १५ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई येथील सुरुची इमारत फ्लॅट नं. ३ मधील सॅनिटरी फिटींग, टाईल्स फ्लोरींगची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | १९.९८ |
| १६ | एल टी मार्ग मुंबई येथील लॉकअप मागील बाजूस ड्रेनेज लाईन व ट्रीमीक्स कॉक्रीटची दुरुस्ती करणे. | ९८.९७ |
| १७ | एन. सी. सी. इमारत मुंबई येथील प्रशासकिय, मुख्य, कमांडींग, हेड ऑफिस येथील प्लास्टर, रंगकाम, दुरुस्ती करणे. | १९.०८ |
| १८ | हाजी अली मुंबई सरकारी वसाहत इमारत १३ मधील फ्लॅट नं. अ-५, अ-९ येथे नुतनीकरण करणे. | ३७.९४ |
| १९ | एल टी मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आवारातील तळ मजला ते ३ मजल्यावरील इमारतीमधील लॉकअप रुम येथे अंतर्गत प्लास्टर व रंगकाम करणे. | १९.०३ |
| २० | एल्फीस्टन टेक्नीकल हायस्कूल मुंबई येथील विविध लिफ्ट व जिना लॉबी दुरुस्ती व नुतनीकरण करणे. (४ ते ५ मजला) | १९.८८ |
| २१ | मुख्य मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट एक्सप्लनेड मुंबई येथील ३ मजल्यावरील आस्थापना विभाग येथे फर्निचरचे कामांची नुतनीकरण करणे. | ३२.११ |
| २२ | नविन विधानभवन मुंबई येथील ४ मजल्यावरील बीजेपी कार्यालय, प्रसाधनगृह, पॅसेज नुतनीकरण करणे. | ६७.५५ |
| २३ | सर जे. जे. स्कुल ऑफ आर्ट आवार मुंबई येथील आर्कीटेक्चर वर्कशॉप पीडब्ल्यूडी चौकी येथे मंगलोरी छताची दुरुस्ती करणे. | १८.७४ |
| २४ | जुने सचिवालय मुख्य इमारत मुंबई येथील जज चेंबर येथे सोफा व खुर्ची प्रदाण करणे. | १३.९५ |
| २५ | जुने सचिवालय विस्तार इमारत येथील डी. जी., मह सचिव होम गार्ड, कमिशनर, चेंबर ऑफिस, कोर्ट रुम येथे प्लास्टर, रंगकाम, दुरुस्ती करणे. | १९.९५ |
| २६ | नविन विधानभवन मुंबई येथील तळमजल्यावरील रुम नं. २७ पुरुष प्रसाधनगृह नुतनीकरण करणे. | ६१.३७ |
| २७ | इंस्टिट्युट ऑफ सायन्स मुंबई येथील मॅथमॅटिक इमारत १ मजल्यावरील पुरुष महिला प्रसाधनगृह दुरुस्ती करणे. | १४.५२ |
| २८ | एल. टी. मार्ग मुंबई येथील सी. पी. ऑफिस कंपाऊंड क्राइम कॉलअप इमारत पुर्व बाजूस दुरुस्ती करणे. | ४०.२९ |
| २९ | वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई येथील ३ मजल्यावरील मेकर टॉवर ई- विंग महाराष्ट्र ॲडमिनिस्ट्रेटिव ट्रिब्युनल मंबई येथे फॉल्स सिलिंग, पॉलिश, दुरुस्ती करणे. | १८.८७ |
| ३० | नविन विधानभवन मुंबई येथील तळमजल्यावरील रुम नं. २७ महिला प्रसाधनगृह नुतनीकरण करणे. | २३.३५ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १४.१.२०२५ ते दि. २८.१.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. २९.१.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/ ९८८
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ७/१/२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५६१९



## महाराष्ट्र शासन

### सार्वजनिक बांधकाम विभाग

### निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ कोऱ्या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक १३.१.२०२५ ते २०.१.२०२५ पर्यंत देण्यात येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक २१.१.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुने जकात घर मुंबई येथील तळ मजल्यावरील सेवकनिवासस्थान येथे मंगलोरी टाईल्स छताची दुरुस्ती करणे. | ७,९९,८७२/- | ८,०००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | जुने सचिवालय मंबई मुख्य इमारत येथे प्रसाधनगृह, पार्टीशन, दरवाजे, खिडक्या, ॲल्युमिनिअम पार्टीशन कोर्ट-२ येथे नुतनीकरण करणे. | ५,३९,०४७/- | ५,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | उच्च न्यायालय मुंबई येथील पीए/ पीएस एरिया येथे चेंबर ६७ येथे पीओपीची फॉल्स सिलिंगची दुरुस्ती करणे. | २,६४,८२५/- | २,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. २३६/- |
| ४ | जे. जे. स्कुल ऑफ आर्ट परिसर मुंबई येथील जुनी व नविन अप्लाईड आर्ट इमारत (भाग - २२,२३,२४) | ६,४७,२२०/- | ६,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | जे. जे. स्कुल ऑफ आर्ट परिसर मुंबई येथील जुनी व नविन अप्लाईड आर्ट इमारत (भाग - २५,२६) | ४,०३,३४३/- | ४,१००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | मंत्रालय मुंबई मुख्य इमारत मुख्य पोर्च, सचिव पोर्च येथे पेवर ब्लॉकची दुरुस्ती करणे. | ८,४०,८७५/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | मंत्रालय मुंबई मुख्य व विस्तार इमारत येथे कार्यालयामध्ये प्लास्टर, रंगकाम, फॉल्स सिलिंग, एसीपी पॅनलिंग इ. दुरुस्ती करणे. | ८,३८,६२०/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील १ मजल्यावरील विविध रुमची दुरुस्ती करणे. | ८,३७,२९६/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | मंत्रालय विस्तार इमारत मुंबई येथील ६ मजल्यावरील निवडणूक कार्यालय रुम नं. ६२४ येथे नुतनीकरण करणे. | ६,२५,९८२/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | उच्च न्यायालय मुंबई येथील कोर्ट रुम २० मध्ये विविध कामे करणे. | १,६७,८२४/- | ८,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. २३६/- |
| ११ | सिटी सिव्हिल कोर्ट इमारत मुंबई येथील दरवाजे, खिडक्या, सुतार मटेरीअल, सॅनिटरी, पाणी पुरवठा फिटींग, प्लंबींग मटेरीअल इ. रंगकाम, प्लास्टर, दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | ७,३१,५५४/- | ७,४००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | एक्सप्लानेड मुंबई सीएमएम पोलिस स्टेशन इओडब्ल्यु कार्यालय, पासपोर्ट कार्यालय, पीडब्ल्युडी कार्यालय येथील वॉटर प्रुफिंगचे काम करणे. | ७,१९,७७३/- | ७,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ९२८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ७/१/२०२५

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५६१५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# वाकड पोलिसांची कारवाई; महागड्या गाड्या चोरणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला केले गजाआड

■ **पुणे : अभिजीत येरल्लू**

वाकड पोलिसांनी महागड्या कार चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीला अटक करत त्यांच्याकडून तब्बल ६० लाख रुपये किंमतीच्या चारचाकी वाहनांचा माल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अल्ताफ कासम अत्तार (४०, रा. शितलानगर, देहूरोड), जुबेर कयामुद्दीन कुरेशी (३४, रा. उत्तर प्रदेश), मुसाहिद अलीयास खान (३१, रा. हरियाणा), आणि नानीशार कमर अली (३८, रा. मध्यप्रदेश) अशी आहेत.

पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात मागील काही महिन्यांपासून कार चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. २ जानेवारी रोजी वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एका क्रेटा कारची चोरी झाली होती. चोरी प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी द्रुतगती मार्ग आणि आसपासच्या भागातील तब्बल ७०-८० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपासाची दिशा निश्चित करून ६ जानेवारी रोजी थेरगाव येथून तीन आरोपींना अटक करण्यात आली.

अल्ताफ अत्तार, स्थानिक आरोपी, गाडी शोधून काढण्याचे काम करत असे. तो चोरी केलेली गाडी टोलनाके चुकवत लोणावळा येथे पोहोचवत असे. गाडीची काच फोडून चोरी करताना, आधीच नवीन काच सोबत ठेवली जात असे. मुसाहिद अलीयास खान हा ह्युंडाई गाड्यांचा एक्स्पर्ट मेकॅनिक आहे. त्याने गाडी चोरीसाठी बनावट चाव्या तयार केल्या होत्या. तो ओबीडी स्कॅनर डिव्हाइसच्या मदतीने गाडीची चावी मॅच करून गाड्या सुरू करीत असे. आरोपी जुबेर कुरेशी मेरठ, उत्तर प्रदेश येथील असून गाड्यांचे स्पेअर पार्ट्स भारतभर विक्री करायचा. आरोपींकडून ५४ लाख ४३ हजार ३१० रुपये किमतीच्या तीन ह्युंडाई क्रेटा कार, एक किया सेल्टॉस, स्नॅकर, बनावट चाव्या तयार करण्यासाठीचा की-मेकिंग स्कॅनर, विविध कंपनीच्या ४० गाड्यांच्या बनावट चाव्या, नंबर प्लेट, सात मोबाईल फोन, आणि चोरीसाठी लागणारे इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.




ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त विशाल गायकवाड, आणि सहायक आयुक्त सुनिल कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. वाकड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर, सहायक निरीक्षक सुभाष चव्हाण, उपनिरीक्षक अनिरुद्ध सावर्डे, विभीषण कन्हेरकर, पोलीस अंमलदार संदीप गवारी, वंदु गिरे, ज्ञानदेव झेंडे, कौंतेय खराडे, सौदागर लामतुरे, तात्यासाहेब शिंदे, नामदेव वडेकर, विजय भुसारे, सचिन गायकवाड, रामचंद्र तळपे, विजय घाडगे, दीपक साबळे, मंगेश लोखंडे यांच्या पथकाने केली. या आरोपींकडून केवळ वाकडच नाही तर नवी मुंबईसह इतर ठिकाणचे एकूण नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत. टोळीच्या कार्यपद्धतीमुळे पोलिसांना अधिक सखोल तपासाची गरज असल्याचे दिसून आले आहे. वाकड पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे शहरातील वाहन चोरी करणाऱ्या टोळ्यांवर आळा बसेल, असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# दोन सराईत बाईक चोरट्यांच्या मानपाडा पोलीसांनी आवळल्या मुसक्या

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

कल्याण, डोंबिवली आणि नवी मुंबई परिसरात गेल्या काही महिन्यांपासून दुचाकी चोरीच्या घटना वाढत आहेत. नागरिकांच्या तक्रारी आणि चोरीच्या वाढत्या घटनांमुळे स्थानिक पोलिस यंत्रणा सतर्क झाली होती. याच पार्श्वभूमीवर मानपाडा पोलिसांनी दुचाकी चोरीचा पर्दाफाश करत दोन सराईत चोरट्यांना अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही चोर हे २० ते २५ वयोगटातील आहे. त्यांनी आतापर्यंत चार वेगवेगळ्या ठिकाणांहून दुचाकी चोरी केल्याचे उघड झाले आहे. या दोघांनी चोरी केलेल्या दुचाकींपैकी चार दुचाकी पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. या दुचाकींची एकूण किंमत लाखोंच्या घरात आहे. या चोरट्यांनी चोरीच्या दुचाकी स्थानिक भागात किंवा



अन्यत्र कमी किमतीत विकण्याचा प्रयत्न केला होता. पोलिसांचा तपास सुरु असताना मिळणाऱ्या माहितीच्या आधारे उल्हासनगर परिसरात सापळा रचला. दोन्ही आरोपींना एका दुचाकीसह पकडण्यात आले. प्राथमिक चौकशीत त्यांनी दुचाकी चोरीचे गुन्हे कबूल केले आहेत. या दोघांना ताब्यात घेऊन पोलिसांनी त्यांच्या आधीच्या गुन्ह्यांचीही चौकशी सुरू केली आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार, हे दोघेही यापूर्वी चोरीसाठी अटक झालेले आहेत. त्यांच्या विरोधात याआधीच विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणामुळे पोलिसांनी त्यांचा भूतकाळ तपासून त्यांच्या गुन्हेगारी टोळीशी संबंधित इतर सदस्यांचा शोध सुरू केला आहे. तपासादरम्यान असे आढळले की, हे चोरटे मुख्यतः रहदारी असलेल्या भागात, पार्किंगमध्ये किंवा एकट्या दुचाकी उभ्या असलेल्या ठिकाणी लक्ष ठेवून चोरी करत. गाडीच्या लॉकची तोडफोड करून किंवा डुप्लिकेट चावीचा वापर करून ते गाड्या पळवायचे.या कारवाईमुळे स्थानिक नागरिकांमध्ये एक प्रकारचा दिलासा मिळाला आहे. पोलिसांनी केलेल्या प्रभावी कारवाईमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. चोरी झालेल्या दुचाकी परत मिळण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

# बलात्कार, विनयभंगातील तीन आरोपींना अटक

■ **मुंबई : सम्यक कासारे**

मानखुर्द पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही महिन्यात विनयभंग आणि बलात्काराच्या तीन वेगवेगळ्या घटना घडल्या होत्या. यातील तिन्ही आरोपी अनेक दिवसांपासून फरार होते. पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन दोन आरोपींना उत्तर प्रदेशातून तर एका आरोपीला नवी मुंबई येथून अटक केली आहे. घाटकोपर येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला केटरिंगच्या कामाला लावण्याचे आमिष दाखवून आरोपीने बलात्कार केला होता. त्याबाबत मुलीच्या आईने महिन्याभरापूर्वी मानखुर्द पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मानखुर्द पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला होता. मात्र, आरोपीला त्याची कुणकुण लागताच तो



पसार झाला. अखेर पोलिसांनी शनिवारी आरोपीला नवी मुंबई परिसरातून अटक केली आहे.


अशाच प्रकारे २०२३ मध्ये मानखुर्द पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीने राजस्थान येथे पळ काढला होता. गेल्या वर्षभरापासून पोलीस त्याच्या मागावर होते. दरम्यान, हा आरोपी त्याच्या गावी आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार मानखुर्द पोलिसांनी त्याच्या गावी जाऊन त्याला अटक केली आहे. तर तिसऱ्या घटनेत मानखुर्द पोलिसांनी उत्तर प्रदेश येथूनच एका आरोपीला चार दिवसांपूर्वी अटक केली आहे. त्याने देखील एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून उत्तर प्रदेश येथे पळ काढला होता.

# टोरेस घोटाळा प्रकरणात तिघांना अटक, २६ लाखांची रोकड जप्त

■ **वसई : सुचिता देशमुख**

टोरेस आर्थिक घोटाळ्यात भाईंदर येथील कंपनीशी निघडीत तिघा जणांना नवघर पोलिसांनी अटक केली आहे. त्यात शाखेची जागा भाड्याने देणारी महिला तसेच शाखेचा व्यवस्थापक आणि पर्यवेक्षकाचा समावेश आहे. आरोपींकडून २६ लाखाची रोखड जप्त करण्यात आली आहे. त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. टोरेस कंपनीने आठवड्याला ११ टक्के व्याज परतावा देण्याच्या नावावर मिरा भाईंदरसह मुंबई व इतर शहरात गुंतवणूकदारांची कोट्यावधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे प्रकरण नुकतेच उघडकीस आले आहे. भाईंदरच्या रामदेव पार्क येथील शाखा देखील बंद झाली आहे. याप्रकरणी नवघर पोलिसांनी कंपनीच्या तिघाजणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी व्यवहारासाठी वापरण्यात येणारी कंपनीची दोन बँक खाती गोठवली आहे.

भाईंदरच्या नवघर पोलिसांनी कंपनीशी संबंधित तिघांना विविध ठिकाणांवरून अटक केली आहे. मिरा रोड च्या रामदेव पार्क येथील कार्यालय भाडेतत्वार देणारी महिला लक्ष्मी यादव हिला ताडदेव येथून अटक करण्यात आली आहे. तर पर्यवेक्षक नितित लाखवानी (४७) आणि व्यवस्थापक कैसर खालिद शेख (५२) यांना अटक करण्यात आली आहे.




हे दोघे रामदेव पार्क येथील शाखेत काम करत होते. यातील व्यवस्थापक आणि रोखपालाकडून जवळपास २६ लाख २० हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. सध्या तिघांनाही शुक्रवारी ठाणे सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यांना न्यायालयाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आली आहे.

# वसईतील मयंक ज्वेलर्सवर सशस्त्र दरोडा: सराफ मालक जखमी, लाखोंची लूट

■ **वसई : सुचिता देशमुख**

वसईच्या अग्रवाल सिटी येथील मंयक ज्वेलर्सवर शुक्रवारी रात्री सशस्त्र दरोडा घालण्यात आला. दोन अज्ञात हल्लेखोरांनी बंदूकीच्या सहाय्याने सराफ दुकानाचे मालक रतनलाल संघवी यांना बेदम मारहाण करत दुकानातील लाखो रुपयांचे दागिने घेऊन पळ काढला आहे. माणिकपूर पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी पथके स्थापन केली आहे. या घटनेमुळे दोन वर्षांपूर्वी साक्षी ज्वेलर्सच्या लुटीच्या घटना ताज्या झाल्या आहेत. वसई पश्चिमेच्या बाभोळा येथील अग्रवाल दोशी कॉम्प्लेक्समध्ये मयंक ज्वेलर्स हे दुकान आहे. या दुकानात मालक रतनलाल संघवी (६७) आणि त्यांचा मुलगा मनिष संघवी हे असतात. शुक्रवारी मनिष संघवी कामानिमित्ताने बाहेर गेला होता. रात्री सव्वा नऊच्या सुमारास रतनलाल संघवी दुकान बंद करण्याच्या तयारीत होते. ते दागिने असलेले ट्रे कपाटात ठेवत होते. त्यावेळी दोन सशस्त्र हल्लेखोर दुकानात शिरले. दुकानात शिरताच त्यांनी संघवी यांच्यावर हल्ला केला. त्यांनी बंदुकीच्या दट्टयाने संघवी यांना मारहाण करण्यास सुरवात केली. संघवी यांन आतल्या खोलीत डांबले आणि दागिन्यांचा ट्रे घेऊन पसार झाले. हल्लेखोरांपैकी एकाने डोक्यात हेल्मेट घातले होते




तर दुसऱ्याने मुखपट्टी (मास्क) लावून चेहरा झाकला होता. या हल्ल्यात संघवी प्रचंड जखमी झाले आहे. मात्र आता त्यांची परिस्थितीत आता स्थिर आहे. या लुटीच्या घटनेमुळे परिसरातील सराफमालक आणि दुकानदारांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. परिसरात पोलीस चौकी उभारावी अशी मागणी परिसरातील दुकानदारांनी केली आहे. दोघे हल्लेखोर अचानक सराफ दुकानत शिरले आणि त्यांनी बंदूकसदृश्य वस्तूने संघवी यांना मारहाण करत लुट केली, अशी माहिती पोलीस उपायुक्ता (परिमंडळ २) पूर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी दिली. या लुटीत आणखी आरोपी असू शकतील. आम्ही सर्व ६ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथकांमार्फत तपास करत आहोत, असेही त्यांनी सांगितले. हल्ल्यापूर्वी रेकी केली असण्याची शक्यता आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

या सशस्त्र हल्ल्यामुळे ३ वर्षांपूर्वी नालासोपारा येथील साक्षी ज्वेलर्सवर पडलेल्या दरोड्याची घटना ताजी झाली आहे. नालासोपा पश्चिमेला रेल्वे स्थानकाजवळ किशोर जैन (४८) यांच्या मालकीचे साक्षी ज्वेलर्स हे दुकान होते २१ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी दोन इसमांनी दुकानात शिरून जैन यांची हत्या करून दुकानातील लाखो रुपयांच्या चांदीचे दागिने लुटून नेले होते.

# काळया जादूचा नाश करण्यासाठी बाबा आणणार होता मृतदेह, मृतदेह आणण्यासाठी बाबाने घेतले ८ लाख ८७ हजार रुपये

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

आजारी पती आणि मुलावर केलेली काळ्या जादूचा नाश करण्यासाठी मृतदेह आणावा लागेल, अशी बतावणी करत त्यासाठी एका बाबाने ८ लाख ८७ हजार रुपये घेऊन एका महिलेची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भिवंडी येथील शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला असून पोलिसांनी बाबाचा शोध सुरू केला आहे.

भिवंडी येथील मिल्लतनगर भागात फसवणूक झालेली महिला आपल्या कुटुंबासमवेत राहते. तिचा पती आजारी आहेत. त्याचाच फायदा



घेवून बाबाने तिचा पती आणि मुलगा यांच्यावर कोणीतरी काळी जादु केली, अशी बतावणी केली. तसेच काळी जादू झाल्याचे भासविण्यासाठी बाबाने तिच्या पती आणि मुलावरून अंडे ओवाळून नेण्यास लावून, मंत्रोच्चार करून अंडयातून लोखंडी खिळा काढून दाखविला. याद्वारे त्याने त्या कुटुंबाला काळया जादुवर विश्वास ठेवण्यास भाग पाडले. यावर उपाय म्हणून मृतदेह आणून त्याद्वारे काळीजादुचा प्रयोग करून पती आणि मुलावर केलेल्या काळीजादुचा नाश करण्यात येईल असे सांगितले. तसेच मृतदेह आणण्यासाठी महिलेकडून वेळोवेळी ८ लाख ८७ हजार घेवून तिची फसवणुक करून, पैशांचा अपहार केला आहे.

# भायखळा पोलीसांनी बनावट ५०० रुपयांच्या नोटा छापणाऱ्या आणि वितरित करणाऱ्या टोळीचा केला पर्दाफाश

■ **मुंबई : गणेश बागडे**

सर्वसामान्य नागरिकांना कधीकधी चुकून व्यवहार करताना बनावट ५०० रुपयांच्या नोटा मिळण्याच्या घटना घडतात. या नोटा बँकेत चालत नाहीत. तसेच अशा बनावट नोटा देवून फसवलं जातं. अशाप्रकारे बाजारात बनावट नोटा आणणाऱ्या आरोपींबद्दल सर्वसामान्यांच्या मनात खूप चीड आहे. पण सर्वसामान्य नागरीक काहीच करु शकत नाही. तो केवळ ५०० चलनाच्या ५०० रूपये दराच्या बनावट नोटा बनवणारी टोळी आणि त्या नोटा चलनामध्ये वितरीत करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. याप्रकरणी भायखळा पोलिसांनी सापळा रचून



दैनंदिन व्यवहारातही चालत नाहीत. त्या खोट्या असल्याने त्यांना महत्त्वच नसतं. त्यामुळे ज्याच्या हातात नकळतपणे ही नोट पडते त्याचं ५०० रुपयांचं नुकसान होतं. विशेष म्हणजे भाजी विक्रेते, फळ विक्रेते यांना तर सहजपणे अशा माध्यमातून फसवलं जातं. गर्दीचा गैरफायदा घेऊन दुकानदारालादेखील सहन करु शकतो आणि वाईट नशीब समजून विषय सोडून देतो. पण पोलीस याबाबत कठोर कारवाई करतात. भायखळा पोलिसांनी अशाच बनावट नोटा मार्केटमध्ये आणणाऱ्यांच्या चांगल्याच मुसक्या आवळल्या आहेत. अतिशय थरारक पद्धतीने पोलिसांनी सापळा रचून आरोपींच्या नांग्या ठेचल्या आहेत. ४ आरोपींना अटक केली आहे. भायखळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त बातमीदाराकडून भायखळा पूर्व येथे ३ इसम हे भारतीय चलनाच्या बनावट नोटा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होते. संबंधित ठिकाणी पोलिसांनी दोन पथक तयार करण्यात आले. ते घटनास्थळी दाखल झाले. काही वेळानंतर तीन संशयीत तिथे आले. त्यांना ताब्यात घेवून त्यांची तपासणी केली असता, त्यांच्या जवळ भारतीय चलनाच्या ५०० रूपये किंमतीच्या २०० बनावट नोटा मिळून आल्या. ताब्यात घेतलेल्या तीन इसमांना पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता पालघर जिल्ह्यातील वाडा येथे बनावट नोटा बनवत असल्याची माहिती दिली. पोलिसांनी वाडा येथे जाऊन आरोपी निरज वेखंडे आणि खलील अन्सारी हे बनावट नोटा तयार करत असलेचे आढळून आले. पोलिसांनी ५०० रूपयांच्या बनावट नोटा बनविण्यासाठी लागणारे सर्व साहित्य मिळून आले. यात लॅपटॉप, प्रिंटिंग मशीन, लॅमीलेशन मशीन, तसेच "४ साईजचे १३६७ नग बटर पेपर जप्त केले. या प्रकरणी उमरान उर्फ आसिफ उमर बलबले, यासिन युनूस शेख, भीम प्रसादसिंग बडेला आणि निरज वेखंडे यांना अटक केली. त्यांच्यावर विविध कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील चौकशी सुरू आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ,**
**दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**ई -निविदा सुचना क्र. ४४ सन २०२४-२०२५**

**(फक्त मुंबई उपनगर जिल्हा — पुर्व उपनगरे मजुर सहकारी संस्था यांचे साठी )**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पुर्व उपनगरे) मजूर सहकारी संस्था मार्यादित, मुंबई, कडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. नमुद केल्याप्रमाणे अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्षीक दुरुस्ती अंतर्गत मुख्य रुग्णालयीन इमारत, स्वयंपाकगृह व गोल इमारत राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार मुलुंड येथे वार्षिक दैनंदिन देखभाल दुरुस्तीचीचे कामे करणे. | रु. ११९९८७५/- |
| २ | मुळगोण कामांतर्गत मुख्य इमारत येथे सेंटोस बाजूचे तहसीलदार कार्यालय आणि मुलुंड (प.) मुंबई येथे न्यायालयीन इमारतीत संरचना मजबूत करणे आणि बाह्य प्लास्टर प्रदान करणे | रु. २३६७७९०/- |
| ३ | मुळगोण कामांतर्गत मुलुंड तहसीलदार कार्यालय, मुंबई (प.) येथे पाण्याच्या टाकींच्या वर उत्तर आणि दक्षिण बाजूच्या टेरेसवर प्रीकोटेड शीट प्रदान करणे आणि निश्चित करणे. | रु. ३००७९६७/- |
| ४ | मुळगोण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथील संजय गांधी बाजूच्या तहसीलदार कार्यालयात स्ट्रक्चरल मजबुतीकरण आणि बाह्य प्लास्टर प्रदान करणे. | रु. १७१२७४५/- |
| ५ | मुळगोण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथील एन.टी. येथील नायब तहसीलदार आणि निवासी नायब तहसीलदार यांची दुरुस्ती व नूतनीकरण करणे. | रु. २४८८५५३/- |
| ६ | मुळगोण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथील मुलुंड (प.) मुंबई येथील तहसीलदार बिल्डिंग येथे न्यायालयाच्या बाजूने स्ट्रक्चरल मजबुतीकरण आणि बाह्य प्लास्टर पेंटिंग प्रदान करणे. | रु. २४३८७१०/- |
| ७ | मुळगोण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथे तहसीलदार कार्यालय आणि न्यायालयाची इमारत मध्ये एम.सी.सी. येथे स्ट्रक्चरल मजबुती आणि बाह्य प्लास्टर पेंटिंग प्रदान करणे. | रु. २४१२१४७/- |
| ८ | मुळगोण कामांतर्गत मानखुर्द, चिल्ड्रेन एड सोसायटी, बॅरेक क्र. १०/६५ येथील छप्परांचे नुतनीकरण करणे . | रु.१८११७४१/- |
| ९ | मुळगोण कामांतर्गत देवरत्न नगर चुनाभट्टी पोलीस चौकी इमारत क्र. १/७ येथे टेरेसवर छताला पत्रे व पन्हळी जी.आय. प्रदान करणे आणि निश्चित करणे. | रु.२४९६३८९/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदाउपलब्धकालावधी- दि. १३/०१/२०२५ ते दि.२७/०१/२०२५ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे- दि. २८/०१/२०२५**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ११६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक : - 8 JAN 2025

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५६१३

# घरांचे दर ठरविताना अध्यक्षांना विश्वासात घेतले नव्हते का?

## सिडकोच्या सोडत प्रक्रियेतील संतप्त अर्जदारांचा सवाल

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

सिडको महामंडळाने नवी मुंबईतील विविध नोडमध्ये २६ हजार घरांची सोडत प्रक्रियेतील घरांचे दर जाहीर केल्यानंतर अर्जदारांनी संताप व्यक्त केला. यासंदर्भात गुरुवारी सिडकोचे अध्यक्ष आणि विद्यमान मंत्री संजय शिरसाठ यांना प्रसारमाध्यमांनी प्रश्न विचारल्यावर त्यांनी घरांच्या किमती कमी करण्याची गरज असल्यास नक्कीच त्याचा पुन्हा विचार करु, असे आश्वासन दिले. तसेच सिडको नफा कमवणारी कंपनी नाही, असे विधान केले. सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत दर निश्चित करताना सिडको अध्यक्षांना विश्वासात घेतले नव्हते का, असा प्रश्न आता अर्जदार उपस्थित करत आहेत. तळोजातील घरे प्रदूषण आणि पाण्याच्या समस्येमुळे विक्री होत नसल्याने सिडको मंडळाने २६ हजारांच्या घरांच्या सोडत प्रक्रियेत तळोजातील विविध श्रेणीतील १०,५१८ घरे विक्रीसाठी काढली. प्रदूषण आणि पाण्याच्या समस्येमुळेच तळोजातील आर्थिक दुर्बल घटकासाठीचे वनबीएचके (३२२ चौरस फुट) घराचे दर २५ लाख ते २६ लाख आणि अल्प उत्पन्न गटाच्या श्रेणीतील ३४ ते ४६ लाखांचा दर विक्रीसाठी खुला केला आहे. मात्र अल्प उत्पन्न गटाच्या तळोजातील घर खरेदी करणाऱ्यांना मुद्रांक व नोंदणीशुल्क असे दोन ते अडीच लाख रुपये वरचे मोजावे लागणार आहेत. तसेच ज्या घरांची किमती ७४ लाख आहे अशांना ७९ लाख ५८ हजार आणि ९७ लाख रुपयांचे घर असणाऱ्यांना एक कोटी ४ लाख रुपये मोजावे लागणार आहेत. प्रत्येक इमारतीच्या



सहाव्या मजल्यावरील घरासाठी अधिकचे १० रुपये चौरस फुटामागे आकारले जाणार आहे. सिडकोने काढलेल्या महागृहनिर्माणाच्या सोडत प्रक्रियेमध्ये वेगवेगळ्या ठिकाणची घरे आहेत. यातील काही ठिकाण रेल्वेस्थानकांलगतची घरे असल्याने ही प्राईम लोकेशनच्या घरांची मागणी अधिक आहे. मात्र प्राईम लोकेशनच्या जागेची निवडही त्याचपद्धतीने केली आहे. काही ठिकाणी सध्याच्या बाजारभावातील खासगी विकसकापेक्षा अपसेट किमतीच्या २८ ते ३० टक्के कमी आहे. परंतु काही ठिकाणी घरांच्या किमती वाढल्या असतील तर त्याची मी माहिती घेणार आहे. सिडको ही नफा कमावणारी कंपनी नसून सर्वसामान्यांना घरे देणारी कंपनी आहे. म्हणून घरांच्या किमतीबाबत योग्य तो निर्णय घेऊ. शक्य असल्यास घरांच्या किमती कमी करण्याची गरज असेल तर कमी सुद्धा करु परंतू खासगी विकासकापेक्षा कोणतीही लपवाछपवी न करता सिडको कारपेट क्षेत्रात दर्शविलेले क्षेत्राचे घर सर्वसामान्यांना देते. खासगी विकसकाप्रमाणे लोडींग क्षेत्र घरांवर लादले जात नाही.

## समुद्र क्षेत्रातील अवैध मासेमारी व अनधिकृतपद्धतीने शिरणाऱ्या नौकांवर ड्रोनद्वारे नजर

■ ठाणे : तृप्ती गोरे

महाराष्ट्र राज्याच्या जलाधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठीच्या कायद्याच्या आधारे ठाणे आणि पालघर येथील खाडी आणि समुद्र क्षेत्रातील अवैध मासेमारी आणि अनधिकृतपद्धतीने शिरणाऱ्या नौकांवर लक्ष ठेवण्यासाठी आता ठाणे जिल्हा प्रशासन आणि जिल्हा मत्स्य व्यवसाय विभागाच्या माध्यमातून ड्रोनची मदत घेण्यात येणार येणार घालत असताना प्रत्येक नौकेची तपासणी करणे शक्य होत नाही. तसेच अनधिकृत नौकांचा पाठलाग करीत असताना त्या पळून जात असतात. अशा नौकांना पकडणे जिकरीचे होत असते. गस्ती नौकेसोबतच राज्याच्या जलधीक्षेत्रात नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर केल्यास अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांची पुराव्यासह माहिती विभागास उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. अशा नौकांवर सागरी



आहे. ड्रोनचा वापर करुन मासेमारी नौकांची मॅपिंग करुन झाल्यावर अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती विभागास सुलभरित्या उपलब्ध होणार आहे. तर ड्रोनद्वारे किनारपट्टीवरील जलधी क्षेत्र देखरेखीखाली येणार असून वापरण्यात येणारे ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार आहेत, जेणेकरुन सागरी सुरक्षा बळकट होण्यास देखील मदत होणार आहे. सागरी मासेमारी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता विभागाकडे असलेल्या गस्ती नौकांमार्फत गस्त घालून कार्यवाही करण्यात येत असते. गस्ती नौकेद्वारे समुद्रात गस्त कायद्यांतर्गत कठोरपणे कारवाई करणे सोईचे होईल. तर ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळेस अधिकचे क्षेत्र ड्रोनद्वारे देखरेखीखाली येण्यास मदत होणार आहे.

ड्रोनचा वापर करुन मासेमारी नौकांची मॅपिंग करुन झाल्यावर अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती विभागास सुलभरित्या उपलब्ध होवू शकेल, ड्रोनद्वारे राज्याच्या किनारपट्टीवरील जलधी क्षेत्र देखरेखीखाली येणार असून वापरण्यात येणारे ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार आहेत, जेणेकरुन सागरी सुरक्षा बळकट होण्यास देखील मदत होईल.

## 'सर्वसामान्यांसाठी राज्यात परवडणारे घरी उभारण्याचा आमचा अजेंडा', उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

■ ठाणे : संजय बोडके

सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांसाठी संपूर्ण राज्यात परवडणारे घरी उभारण्याचा आमचा अजेंडा आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी ठाण्यातील कार्यक्रमात बोलताना दिली. तसेच सरकारच्या शाळा दत्तक घेऊन तेथील शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहनही त्यांनी उद्योगपती गौतम सिंघानिया यांना केले. 'रेमंड कंपनी आणि सुपर कुब आयोजित 'ऑटोफेस्ट-२०२५' या ऑटो कार फेस्टिव्हलचे उदघाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी झाले. यावेळी त्यांनी स्पोर्ट्स बाईक आणि रिक्षा चालवण्याचा आनंद लुटला. यावेळी



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि उद्योगपती गौतम सिंघानिया यांच्यासह नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. नगरविकास आणि गृहनिर्माण अशी दोन्ही खाती माझ्याकडेच आहेत. त्यामुळे घरासंबंधी कायदा करणे आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी माझ्याकडेच आहे. सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांना परवडणारी घरे उपलब्ध करून देणे. त्यासाठी ठाणे, मुंबई, मुंबई महानगर आणि संपुर्ण राज्यात परवडणारी घरे उभारणे. परवडणारी भाडे तत्त्वावरील घरे उभारणे, असा आमच्या सरकारचा अजेंडा आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

परदेशातील वाहनांच्या पूर्णनिर्मितीचे काम आपल्या इथे सुरू होईल आणि यामुळे नागरीकांना नोकऱ्या आणि रोजगार उपलब्ध होईल.

## लाडक्या बहिणींना भुजबळांचा इशारा; योजना बंद होणार? उदय सामंत म्हणाले, 'आम्हाला सत्तेपर्यंत...'

■ मुंबई : गणेश बागडे

निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सादर केली. या योजनेसाठी अर्ज केलेल्या सर्व महिलांना सरसकट या योजनेचे हप्ते देण्यात आले. मात्र, आता महायुतीचं सरकार आल्यानंतर या योजनेचे निकष कठोर केले जाणार असल्याची चर्चा आहे. या योजनेसाठी पात्र नसलेल्या महिलांना यापुढे योजनेचा हप्ता मिळणार नाही. त्यामुळे आता काही लाभार्थी महिला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. कोणत्याही लाभार्थी महिलेसंदर्भात तक्रार प्राप्त झाली तर तिच्या अर्जाची छाननी केली जाईल. त्यानुसार निकषबाहय अर्ज अपात्र करण्याचा निर्णय झाल्याचं महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार छगन भुजबल यांनी अपात्र लाडक्या बहिणींना इशारा



दिला आहे. नियमांत न बसणाऱ्या महिलांनी स्वतःहून आपली नावं योजनेतून काढून टाकायला हवीत, असंही ते म्हणाले. छगन भुजबळ म्हणाले, 'अपात्र महिलांनी योजनेतून आपलं नाव काढून घेण्यासाठी त्यांना आवाहन केलं पाहिजे. तसेच, सरकारने आतापर्यंत ज्या अपात्र महिलांना या योजनेचे पैसे दिले आहेत ते परत मागण्यात काही अर्थ नाही. सरकारनेही ते पैसे आता मागू नये. मात्र, लोकांना यापुढे सांगावं की नियमांत न बसणाऱ्या महिलांनी स्वतःहून या योजनेतून त्यांचं नाव काढून घ्यावं, अन्यथा त्यांच्याकडून दंड वसूल केला जाईल. याआधी आपण जे पैसे महिलांना दिले आहेत ते आपण लाडक्या बहिणींना अर्पण केलेत असं समजूया, ते परत मागू नयेत.' दरम्यान, महायुतीचं आता सरकार आलं आहे, त्यामुळे आता राज्य सरकार टप्प्याटप्प्याने योजना बंद करू शकतं.

# एसटी महामंडळातील जुन्या बस मोडीत काढून, एसटीच्या ताफ्यात येणार २०० इलेक्ट्रिक बस

■ पुणे : अभिजीत येरल्लू

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळांतर्गत (एसटी) पुणे विभागाच्या ताफ्यात येत्या वर्षभरात २०० इलेक्ट्रिक बस येणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर, पूर्वीपेक्षा जास्त बस चार्जिंग करण्यासाठी चार्जिंग स्टेशनची क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तावित स्वारगेट, दापोडी 'चार्जिंग स्टेशन्स'वर एकाच वेळी ३६ बस चार्ज होणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागणार नाही. केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार, आयुर्मान संपलेली १५ वर्षांपुढील सरकारी वाहने मोडीत काढण्यात येत आहेत. तसेच, पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक बसची संख्या वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. त्यानुसार, राज्य सरकारनेही एसटी महामंडळातील जुन्या बस मोडीत काढून इलेक्ट्रिक बस वाढविण्यावर भर दिला आहे. त्यामुळे, एसटी महामंडळात येत्या वर्षभरात पाच हजार इलेक्ट्रिक बस दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'येत्या वर्षभरात पुणे विभागात २०० इलेक्ट्रिक बस टप्प्याटप्प्याने दाखल होतील. सध्या पुणे विभागात ६६ इलेक्ट्रिक बस आहेत. या बसचे चार्जिंग शंकरशेठ रस्त्यावरील मुख्य कार्यालयाच्या ठिकाणी होते. अचानक उद्भवलेल्या तांत्रिक अडचणींमुळे किंवा चार्जिंगसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने बसचे वेळापत्रक कोलमडते व प्रवाशांना ताटकळत उभे रहावे लागते. त्या पार्श्वभूमीवर शहराच्या विविध भागांमध्ये 'चार्जिंग स्टेशन' वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,' असे पुणे एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी सांगितले. 'स्वारगेट आणि दापोडी येथे 'चार्जिंग स्टेशन' उभारण्यासाठी आवश्यक




परवानग्यादेखील घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक चार्जिंग स्टेशनवर सात ते आठ बस चार्ज होतील, असे नियोजन करण्यात आले होते. मात्र, येत्या दोन दिवसांत नव्याने १५ बस ताफ्यात दाखल होणार असल्याने 'चार्जिंग स्टेशन'वर ताण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय, वर्षभरात इतर बस टप्प्याटप्प्याने जरी दाखल होणार असल्या, तरी हा ताण वाढत जाणार असल्याने स्वारगेट आणि दापोडी येथील 'चार्जिंग स्टेशन'वरील बस चार्ज करण्याची क्षमता पूर्वीपेक्षा अधिक वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, प्रत्येक 'चार्जिंग स्टेशन'वर एका वेळी १८ बस चार्ज होतील, अशा पद्धतीने ३६ चार्जिंग केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला होता. या बदलाला मान्यता मिळाली असून, उच्च दाबाचा विद्युत पुरवठा करणाऱ्या भूमिगत वाहिन्या टाकण्यासाठी महावितरण कंपनीला सूचना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार आवश्यक परवानग्या प्राप्त करून लवकरच विद्युतपुरवठाही सुरू करण्यात येईल,' असेही त्यांनी नमूद केले. पुणे विभागांतर्गत पुणे ते छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक, कोल्हापूर आणि सोलापूर मार्गांवर ई-शिवाई सुरू करण्यात आली आहे. कोल्हापूर आणि सातारा मार्गांवर इलेक्ट्रिक बस सुरू करण्यात येणार आहेत. सोलापूर मार्गावरून धावणाऱ्या बस शंकरशेठ रस्त्यावरील चार्जिंग स्टेशनवर, कोल्हापूर, सातारा सांगली मार्गावरून येणाऱ्या बस स्वारगेट येथील 'चार्जिंग स्टेशन' येथे चार्ज होतील, तर नाशिक, धुळे, तसेच उत्तर महाराष्ट्रातून येणाऱ्या बस दापोडी येथील 'चार्जिंग स्टेशन'मध्ये चार्ज होतील.

## ठाण्यात मदत यंत्रणेच्या सतर्कतेमुळे टळली मोठी दुर्घटना, इमारतमधील लॉन्ड्री दुकानात आग लागल्याने सर्वत्र पसरला होता धूर

■ ठाणे : तृप्ती गोरे

येथील श्रीनगर भागातील गंगा विहार या तळ अधिक चार मजली इमारतीच्या तळ मजल्यावरील नित्यानंद लॉन्ड्री दुकानात रविवारी पहाटे आग लागली. आगीमुळे इमारतीमध्ये धूर पसरल्याने सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीमधील २५० रहिवाश्यांना अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यानी सुखरूप बाहेर काढले. तसेच तासाभरात ही आग पूर्णपणे शमविली. मदत यंत्रणेच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

ठाणे येथील श्रीनगर भागात गंगा विहार ही तळ अधिक चार मजली इमारती आहे. या इमारतीच्या तळमजल्यावर नित्यानंद लॉन्ड्री नावाचे दुकान आहे. या दुकानात रविवारी पहाटे ५ वाजता आग लागली. ही माहिती दुकान मालक



बहादुर बेनी यांनी देताच वागळे इस्टेट विभाग अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. आगीमुळे इमारतीत सर्वत्र धूर पसरला होता. गंगा विहार या चार मजली इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर १२ सदनिका आहेत. तसेच संपूर्ण इमारतीत एकूण ४८ सदनिका आहेत. त्यामध्ये अंदाजे २५० रहिवासी राहतात. पहाटेची वेळ असल्याने नागरिक घरात झोपलेले होते. आग लागून इमारतीमध्ये सर्वत्र धूर पसरल्याने सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीमधील २५० रहिवाश्यांना अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यानी सुखरूप बाहेर काढले. आगीत नित्यानंद लॉन्ड्री मधील इस्त्री, लाकडी कपाट, कपडे, विद्युत वायरिंग इतर साहित्य जळून नुकसान झाले आहे.

## एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना उत्तम सोयीसुविधा असणारे कॅशलेस रुग्णालय उभारणार

■ ठाणे : प्रतिनिधी

राज्य परिवहन उपक्रमातील (एसटी) कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना मोफत औषधोपचार मिळावेत यासाठी प्रत्येक जिल्हयात आगारात २५ तर, मुंबईत १०० खाटांचे कॅशलेस रुग्णालय उभारण्यात येतील. या रुग्णालयात राज्य शासनाच्या महात्मा फुले आरोग्य योजनेतून पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत करण्यात येतील, अशी घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी ठाण्यातील रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमात बोलताना केली. तसेच गुजरात आणि कर्नाटकची परिवहन सेवा चांगली सुविधा देत असून




त्यामुळे तिथे जाऊन पाहाणी करून आपल्या येथेही तसे बदल करण्यात येतील, असेही ते म्हणाले. राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना या उपक्रमाचे उद्घाटन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते झाले. तसेच राज्य परिवहनच्या ठाणे विभागात दाखल झालेल्या १७ बसगाड्यांचे लोकार्पण त्यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात मंत्री सरनाईक यांनी उपस्थित एसटी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. राज्य परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या माफक अपेक्षा पूर्ण केल्या तर, ते नागरिकांना अधिक चांगली सुविधा देऊ शकतील. त्यामुळे त्यांच्या विश्रांतीसाठी व्यवस्था, आंघोळीसाठी गरम पाण्याची सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच इतर सुविधा पुरविण्यावर भर द्यायला हवा, असे सरनाईक म्हणाले. राज्य परिवहन उपक्रमातील कर्मचाऱ्यांना दृष्टीदोष असल्याने अपघात होतात, असे वृत्त नुकतेच वाचले. या कर्मचाऱ्यांची घरची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसते. अनेक संकटांचा ते सामना करतात. मुलांचे शिक्षण आणि आई-वडिलांच्या औषधाचा प्रश्न त्यांच्यापुढे असतो. या कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबियांना मोफत औषधोपचार मिळावेत, यासाठी एक योजना आणणे गरजेचे आहे. यामुळेच प्रत्येक जिल्हयातील आगारात २५ खाटांचे तर, मुंबईतील बोरिवली आगारात १०० खाटांचे कॅशलेस रुग्णालय उभारण्यात येतील. ठाणे शहरात गंगुबाई शिंदे आणि इंदिराबाई सरनाईक अशी दोन कॅशलेस रुग्णालय असून येथे रुग्णांवर महात्मा फुले आरोग्य योजनेतून पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत केले जातात.

# नवी मुंबई एमआयडीसीतील सेवा रस्ता लगतचे भूखंड देणे घातक, वनमंत्री गणेश नाईक यांचे विधान



■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

नवी मुंबई एमआयडीसीतील सेवा रस्ता लगतचे भूखंड देणे घातक असल्याचे विधान राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी केले आहे. हे भूखंड देण्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देखील मान्य नव्हते. मात्र तरीही या भूखंडांचे वाटप केले गेले. एकनाथ शिंदे यांनी भूखंड देण्याबाबतची प्रकिया रद्द करा असे आदेश दिले होते. या आदेशाबाबत भविष्यकाळात कारवाई होईल असा मला विश्वास आहे, असे नाईक म्हणाले.

एकनाथ शिंदे यांच्या कालखंडामध्ये त्यांची इच्छा नसतानाही काही गोष्टी चुकीच्या घडल्या आणि हे मी त्यांनाही बोललो होतो. त्यावेळी त्यांची हतबलता नव्हती. परंतु काही गोष्टी त्या कालखंडामध्ये सहन कराव्या लागतात. नजरेला चांगले दिसत नसतानाही त्याकडे दुर्लक्ष करावे लागते, असे विधान वनमंत्री गणेश नाईक यांनी बुधवारी नवी मुंबईतील कार्यक्रमात बोलताना केले होते. नवी मुंबई पोलीस आयुक्तयाच्या वतीने शहरात 'नशामुक्ती अभियान' राबविण्यात येत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ बुधवारी झाला. यावेळी नाईक यांनी हे वक्तव्य केले होते. असे असतानाचा आता गणेश नाईक यांनी नवी मुंबईतील एमआयडीसी भूखंड वाटपाबाबत मोठे विधान करताना गेल्या पाच वर्षांत ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयात झालेल्या भूखंडवाटपाविषयी देखील पुन्हा हरकत नोंदवली आहे. गणेश नाईक आमदार असताना त्यांनी ठाणे – बेलापूर रस्त्याजवळच्या आणि नवी मुंबई एमआयडीसी क्षेत्रातील सेवा रस्ता लगतचे भूखंड विकण्यासाठी ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील दलालांची टोळी सक्रिय झाली असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत केला होता. या भूखंडाचा उपयोग हा विविध विकासकामे उभारण्यासाठी अपेक्षित असल्याचे त्यांनी सातत्याने सांगितले होते. याच भूखंडाचा वाद आहे. नवी मुंबई एमआयडीसीतील सेवा रस्ता लगतचे भूखंड देणे अत्यंत घातक आहे. हे भूखंड देण्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील सकारात्मक नव्हते. तरीही हे भूखंड दिले गेले आहेत. एकनाथ शिंदे यांनी भूखंड देण्याबाबतची प्रकिया रद्द करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाबाबत भविष्यकाळात कारवाई होईल असा मला विश्वास असल्याचेही गणेश नाईक यांनी स्पष्ट केले आहे.